



ं सं. वाचनालय, ठाणे
षय बा.वां
क्र. 386
BVBK-0400386

# : देवेंद्राच्या दरबारांत

त्रेतायुगांतील गोष्ट आहे. एकदां देवराज इंद्राला गर्व झाला. महाबली वृत्रासुराचा त्यानें वध केला होता. ज्यांना कधींहि मृत्यु येत नाहीं, अशा देवांचा तो राजा. ज्यामध्यें नेहमीं सर्व प्रकारचीं सुखें सहज मिळतात आणि जेथें कोणत्याहि प्रकारचें दुःख भोगावें लागत नाहीं, त्या स्वर्गावर त्याचें राज्य. सार्‍या जगांत अत्यंत वैभवशाली अशी अमरावती पुरी त्याची राजधानी. जेथें बाराहि महिने वसंत ऋतु असतो, पहावें तेव्हां फळांफुलांना बहर आलेला, ज्यामध्यें अनेक प्रकारचे सुंदर रंगीबेरंगी पशुपक्षी खेळत, बागडत आणि गोडगोड आवाज करीत आहेत, जेथें झुळझुळ झरे वहात आहेत व निरनिराळ्या रंगांच्या थंड आणि सुवासिक पाण्याचीं कारंजीं उडत आहेत, असें नंदनवन त्याचें क्रीडास्थान. खुद्द बृहस्पति त्याचे गुरु. भूतभावन भगवान शंकराचा प्रतापी पुत्र स्कंद त्याचा सेनापति. सूर्य, चंद्र, यम, वरुण, सोम त्याचे मंत्री. धनपति कुबेर त्याचा खजिनदार. त्याच्या दरबारामध्यें गंधर्व आणि किन्नर गायन करतात. सदा यौवनानें नटलेल्या सौंदर्यशालिनी अप्सरा नृत्य करतात. अखिल विश्वांतील संपत्ति, सुखें, चैनी आणि ऐषआराम जणूं तेथें एकवटलीं आहेत. मग इंद्राला गर्व कां होऊं नये ?

देवर्षि नारदांना ही गोष्ट समजली. त्यांना फार वाईट वाटलें. नारद हे ब्रह्मदेवाचे पुत्र; परंतु त्यांना बिलकुल अभिमान नव्हता. तीनहि लोकांमध्यें नेहमीं फिरत असावयाचें. कोठें अन्याय झाला, कोणीं अत्याचार केला अगर कोणावर कांहीं संकट आलें कीं हे धांवले मदतीला ! कोणीं महान् हेतु साधण्यासाठीं तपश्चर्या करण्यास निघाला कीं, मार्ग दाखविण्यास हे तेथें हजर !

"देव हे तीनहि लोकांमध्यें श्रेष्ठ. इंद्र हा त्यांचा राजा. त्याला अहंकार असणें योग्य नाहीं. मनुष्याला अहंकाराचा मद चढतो. तो इतरांना तुच्छ लेखतो व त्यांजवर अत्याचार करूं लागतो. आपल्यापाशीं जर सामर्थ्य [illegible]ल, तर त्याचा उपयोग गरिबांना मद[illegible]ांचें दुःख दूर

करण्यासाठीं आणि इतरांना सुख देण्यासाठीं केला पाहिजे. परंतु असें न होतां जर त्यापासून लोकांना त्रास होऊं लागला तर दुष्ट राक्षस आणि माणसें किंवा देव यांत फरक तो कोणता? संपत्ति आणि सामर्थ्य यांना चांगुलपणाची जोड पाहिजे. म्हणजे लोकहितासाठीं त्यांचा उपयोग होतो. नाहींतर या पाशवी बळाचा जगाला उपद्रव होईल. देवेंद्राला ही गोष्ट समजावलीच पाहिजे."

असा विचार करीत आणि नेहमींप्रमाणें भगवंतांचे गुण गात देवर्षि नारदांची स्वारी स्वर्गांत हजर झाली.

महेंद्राचा दरबार भरला होता. मध्यभागीं रत्नजडित सुवर्ण सिंहासनावर देवराज विराजमान झाला होता. देवगुरु बृहस्पति, त्याचप्रमाणें इतर मान्यवर मंत्री आणि सभासद आपआपल्या स्थानावर बसले होते. मानवलोकांतील प्रसिद्ध ऋषिमुनी तेथें हजर होते. गंधर्व-किन्नरांनीं देवांचें विजयगीत गाऊन सभेला सुरुवात केली. इतक्यांत—

"जय जगदीश हरे"

ही शांत, मंजुळ आणि पवित्र वाणी थंड आणि मंद वाऱ्याच्या झुळकेबरोबर सुगंध यावा तशी ऐकूं येऊं लागली. परमभागवत देवर्षि नारद येतांच सर्वांनीं उठून त्यांचा सन्मान केला. देवेंद्रानें एका उच्च आसनावर त्यांना बसविलें. परस्परांचे कुशल प्रश्न झाले. नंतर आपल्या वैभवाच्या दिमाखांत इंद्रानें विचारलें—

"देवर्षि, आपलें गमन तीनही लोकीं असतें. कांहीं नवलविशेष आढळलें असल्यास सांगावें."

"देवराज, तुम्हां स्वर्गांतील देवांना नवलविशेष काय सांगणार? परंतु आमच्या दृष्टीनें भूलोकीं एक विशेष गोष्ट आढळली खरी." नारदांनीं कांहींसें हंसून उत्तर केलें.

देवेंद्र : आम्हांला तरी ऐकूं द्या. देवर्षींना विशेष वाटणारी गोष्ट महत्त्वाची असलीच पाहिजे. पण मर्त्यलोकामध्यें अशी महत्त्वाची गोष्ट कोणती?

सर्व सभा अगदीं आतुरतेनें नारदांकडे पाहूं लागली. ते अत्यंत शांतपणें सांगूं लागले—

"देवेंद्रा, मर्त्य आणि स्वर्ग असा फरक करूं नको. ही सर्व सृष्टि त्या दयाघन प्रभूनें रचिली आहे. त्यानें कोठें काय निर्माण केलें आहे, तें कोणीं सांगावें? मी आतां ज्या महापुरुषासंबंधीं सांगणार आहें, त्याजपाशीं तुझ्यासारखें अतुल बल, अमित संपत्ति आणि अनंत सुखसाधनें आहेत. परंतु त्यांना तो महत्त्व देत नाहीं. त्यामुळें तुझ्यासारखी त्याला चिंता वहावी लागत नाहीं. देवगुरू-सारखा तो विद्यासंपन्न आहे आणि नम्रतेमुळें त्याची विद्या फार शोभून दिसते. सहस्ररश्मि सूर्यासारखा तो तेजस्वी आहे, परंतु त्याजकडून लोकांचा ताप दूर होतो. सुधांशूप्रमाणेंच त्याचें दर्शन सुखद आहे आणि तो नेहमींच प्रफुल्लित असतो. त्याचा मुखचंद्र कधींच कलाहीन होत नाहीं. त्याचें हृदय महासागरासारखें विशाल आहे, परंतु तो कधींहि महासागरासारखा प्रक्षुब्ध होत नाहीं. धरणीसारखा तो क्षमाशील आहे; परंतु धरणीच्या पोटांत आग असते, तशी त्याच्या मनाची कधीं आग होत नाहीं. तो आपल्या वचनामध्यें पर्वतासारखा अचल असतो; परंतु पर्वत कधीं कधीं भूकंपानें हालूं लागतो; तसा तो महात्मा कोणतेंहि संकट आलें, तरी आपल्या शब्दापासून ढळत नाहीं. मेघांसारखा तो सर्वांचा जीवनदाता आहे. परंतु मेघांसारखा तो अविश्वासू नाहीं. गंगेसारखें त्याचें अंतःकरण शुद्ध आहे, पण गंगेसारखें त्यामध्यें चढ उतार होत नाहींत. त्या सत्त्वशील महात्म्याशीं तुलना करा-वयास या त्रिभुवनामध्यें एकहि वस्तु मला आढळत नाहीं."

"देवर्षे, आपण आमची थट्टा तर करीत नाहीं?" कांहींसें वरमून इंद्रानें विचारलें.

नारद : नाहीं—देवराज, ही थट्टा नाहीं! भूतलावर सात मोक्षस्थानें आहेत. त्यांतील पहिलें स्थान अयोध्या. ही अयोध्या-नगरी सूर्यवंशाची राजधानी. या तेजस्वी आणि कीर्तिवंत रविकुलाला शोभविणारा सत्यव्रती राजा हरिश्चंद्र हाच तो महापुरुष होय. सूर्यकुलाचे कुलगुरु ब्रह्मर्षि वसिष्ठ आज येथें आहेत. माझ्या म्हणण्याची ते साक्ष देतील.

ऋषिश्रेष्ठ वसिष्ठांनीं संमतिसूचक मान डोलावली. त्यामध्यें त्यांना स्वतःचाच गौरव वाटत होता.

महर्षि विश्वामित्र तेथें होते. वसिष्ठमुनींशीं ते स्पर्धा करीत असत. ते वसिष्ठमुनि ज्याचे गुरु होते, त्या हरिश्चंद्राचा मोठेपणा त्यांना सहन झाला नाहीं. ते उसळून म्हणाले,

"देवर्षि, आपणांला सर्वजण फार मान देतात, म्हणून आपण असें बेजबाबदारपणें बोलतां. पण हें योग्य नाहीं. चकाकतें तें सर्वच सोनें असतें असें नाहीं. खेरीज सोन्याचीहि किंमत ठरविण्यापूर्वी त्याला कस लावावा लागतो."

यावर वसिष्ठ अभिमानानें पण शांतपणें म्हणाले, "मुनिराज, आपण योग्य परीक्षक आहांत. आपणच कस लावून पहावा. शुद्ध सुवर्ण अग्नींत घातलें तर तें अधिकच चमकतें. पण लक्षांत असूं द्या. अयोध्यानाथ हरिश्चंद्र महान धर्मात्मा, दानशूरांचा अग्रणी, सत्यवादी आणि प्रजावत्सल आहे. त्याच्या राज्यामध्यें कधीं दुष्काळ पडत नाहीं; कोणी आजारी पडत नाहीं; कोणी अकालीं मृत्यु पावत नाहीं; कीं अधर्माकडे कोणाची प्रवृत्ति होत नाहीं. वैभव, सत्ता, सामर्थ्य आणि विद्या यांचा गर्व तेथें कोणाला होत नाहीं. त्याच्या राज्यामध्यें लोकांचे व्यवहार प्रेमानें आणि सहकार्यानें चालतात. त्याची राणी सती साध्वी तारामती ही थोर पतिव्रता असून, सर्वस्वी आपल्या पतीला अनुसरणारी आहे. राजर्षींची परीक्षा घेणें सोपें नाहीं."

"ऋषिश्रेष्ठांची सूचना आमच्या लक्षांत आली; तरीहि हरिश्चंद्राची परीक्षा घेण्यास आम्ही तयार आहोंत." विश्वामित्र म्हणाले.

विश्वामित्रांचें हें बोलणें ऐकून देवेंद्राला मनापासून आनंद झाला. परंतु देवर्षि नारद, ब्रह्मर्षि वसिष्ठ ह्यांसारख्यांपुढें तो दाखविणें योग्य नव्हतें. म्हणून शिष्टपणाचा आव आणून तो म्हणाला,

"मुनिवर्य, आम्ही आपणांला दुजोरा देऊं शकत नाहीं. धर्मज्ञता आणि नीतिमत्ता यांविषयीं सूर्यवंशाची प्रसिद्धि आहे. ते प्राण देतील, पण आपला शब्द मोडणार नाहींत. रघुवंशाचा पहिला पुरुष थोर मनु यानेंच सर्वप्रथम पृथ्वीवर धर्माचा प्रकाश

पाडला. परम भगवद्भक्त ध्रुव यानें केवळ पांच वर्षांच्या कोंवळ्या वयांत भगवंताचें दर्शन घेऊन अढळपद मिळविलें. नृपोत्तम पृथूमुळें तर भूलोकाला पृथ्वी हें नांव मिळालें. महात्मा शिबीची परीक्षा आम्हीं स्वतः घेतली आहे. एका क्षुद्र कपोताच्या रक्षणासाठीं त्या उदार राजानें स्वतःच्या हातानें आपल्या शरीराचें मांस काढून दिलें. इक्ष्वाकु, मांधाता यांसारख्यांच्या थोर कुळांत हरिश्चंद्राचा जन्म झाला आहे. 'शुद्ध बीजापोटीं। फळें रसाळ गोमटीं' असावयाचींच. नेहमींच्या साध्या वागणुकींतहि मनुष्याचें अंतःकरण दिसून येतें. मग कठीण परीक्षा घेऊन एकाद्या सज्जनाला त्रास पोहोंचविणें अयोग्य नाहीं का?"

निखाऱ्यावर फुंकर घालावी म्हणजे तो जसा पेट घेतो त्याप्रमाणें रागावून विश्वामित्र म्हणाले,

"देवराज, आपणच एका मानवाची स्तुति करूं लागला मग संपलेंच! टांकीचे घाव खाल्ल्याखेरीज देवपणा येत नाहीं. हे टांकीचे घाव खाण्याचें सामर्थ्य त्याजपाशीं किती आहे, याचा कस लागलाच पाहिजे. मोठेपणाचा आव आणणारे पुष्कळ असतात; परंतु प्रसंग ओढवला म्हणजे त्यांत टिकणारे वीरपुरुष विरळाच. अशा वीरपुरुषाला वंदन करायला आम्ही तयार आहोंत. आम्ही हरिश्चंद्राची परीक्षा घेऊं. जर तो आमच्या कसोटीला उतरला, तर आमच्या अनेक वर्षांच्या उग्र तपश्चर्येचें फळ त्याला देऊं."

वसिष्ठ: फार उत्तम! पण फिरून तें तपःसामर्थ्य मिळवायला काय कष्ट पडतील, याचा विचार आधीं केलेला बरा.

विश्वामित्र: घोडामैदान जवळच आहे. पाहूं या काय होतें तें. परंतु आपल्या लाडक्या शिष्याला आधीं सूचना देऊन आमचा विश्वासघात करूं नका म्हणजे झालें!

वसिष्ठ: त्याची बिलकुल आवश्यकता नाहीं.

तेजस्विनः सुखमसूनपि संत्यजन्ति ।
सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम् ॥

(सत्याचें व्रत घेतलेले तेजस्वी पुरुष संकटांत सांपडले असतां सुखानें आपला प्राणहि देतील; परंतु आपलें व्रत–प्रतिज्ञा–मोडणार नाहींत.)

गोष्ट एकेरीवर आलेली पाहून देवेंद्रानें दरबार बरखास्त केला. विश्वामित्र अत्यंत कडवे असल्यामुळें ते हरिश्चंद्राची कठीण परीक्षा घेतील, याबद्दल त्याला जसा आनंद वाटत होता; तसाच सज्जनांचा छळ झाला म्हणजे त्याचा परिणाम वाईट होतो, हें माहीत असल्यामुळें भीतीहि वाटत होती.

## २ : गुरुदेव वसिष्ठांची कामगिरी

सामर्थ्यसंपन्न आणि क्रोधी विश्वामित्रानें हरिश्चंद्राच्या सत्त्व-हरणाची घोर प्रतिज्ञा केली. त्यामुळें प्रेमळ वसिष्ठांना फार काळजी वाटूं लागली. "त्याला या गोष्टीची सूचना न देण्याचें मीं कबूल केलें आहे. तरीहि त्याच्या रक्षणासाठीं प्रयत्न करणें माझें कर्तव्य आहे" असा विचार करीत महर्षि वसिष्ठ इंद्रसभेंतून निघून अयोध्येच्या राजदरबारीं आले.



वसिष्ठांनीं राजाला प्रेमानें आशीर्वाद दिला.

कुलगुरूंना पहातांच विनयशील हरिश्चंद्रानें उठून वंदन केलें. वसिष्ठांनीं प्रेमानें त्याला आशीर्वाद दिला—

स्वस्त्यस्तु ते कुशलमस्तु चिरायुरस्तु ।
गोवाजिहस्तिधनधान्यसमृद्धिरस्तु ॥
ऐश्वर्यमस्तु, कुशलोऽस्तु रिपुक्षयोऽस्तु ।
संतानवृद्धिसहिता हरिभक्तिरस्तु ॥

(राजा, तुझें कुशल असो. कल्याण असो. तुला दीर्घायुष्य लाभो. तुझ्यापाशीं गायी, घोडे, हत्ती आणि धनधान्य यांची समृद्धि होवो. तुला ऐश्वर्य प्राप्त होवो. तूं सुखी राहून तुझ्या शत्रूंचा नाश होवो. तुला पुष्कळ संतति लाभो. आणि हरिभक्तीमध्यें तुझें मन रमो.)

परंतु गुरुवर्यांचा चेहरा उदासीन असलेला पहातांच त्याला आश्चर्य वाटलें.

"आज गुरुवर्यांना कांहीं चिंता लागलेली दिसते. या सेवकाला त्याचें कारण समजूं शकेल का?" हरिश्चंद्रानें अत्यंत नम्रपणें विचारलें.

वसिष्ठ : राजन, कालगति मोठी विचित्र असते. सामान्य लोकांना त्याची कल्पना येत नाहीं. ते आपल्याच गुर्मींत असतात; म्हणून कोळ्याच्या जाळ्यांत माशी अडकावी, तसे ते कालचक्रामध्यें अडकले जातात. यासंबंधीं विचार करीत होतों.

हरिश्चंद्र : 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' हें वचन गुरुदेव, आपल्यामुळें सत्य ठरलें आहे. मग कालचक्रामध्यें मनुष्याच्या सुटकेचा कांहीं मार्ग सांपडलाच असेल.

वसिष्ठ : होय. नृपश्रेष्ठा, यांतून बाहेर पडण्याचा मार्ग आहे. परंतु त्यासाठीं मनुष्यानें ताठा टाकून नम्र बनलें पाहिजे. नम्र मनुष्यालाच सभोंवतालची परिस्थिति नीट ओळखतां येते आणि शांतपणें विचार करून त्यांतून आपला उद्धार करून घेतां येतो. 'धर्मो रक्षति रक्षितः' जो आपल्या धर्माचें, स्वकर्तव्याचें पालन करतो, त्याचा कधींहि अधःपात होत नाहीं. मग त्याला कदाचित् दैन्यावस्था येईल; अनेक कष्ट सहन करावे लागतील; पुष्कळ

अडचणींना तोंड द्यावें लागेल आणि लोकांमध्यें त्याचा अपमानहि होईल. परंतु राखेखालचा निखारा जसा संधि येतांच फुलूं लागून प्रज्वलित होतो, तसाच कर्तव्यदक्ष इसमहि आपल्या तेजानें संधि येतांच पुढें आल्याखेरीज राहाणार नाहीं. मनुष्य सत्यानें वागेल, सरळपणा सोडणार नाहीं, अंतःकरण नेहमीं उघडें ठेवील आणि सर्वांच्या हितावर नजर ठेवून व्यवहार करील, तर त्याला वांकविण्याची काळाचीहि हिंमत नाहीं. देवहि याचेंपुढें लोटांगण घालतील.

हरिश्चंद्र : आम्ही धन्य आहोंत! गुरुदेवांच्या या बोधसुधेचा आम्हांला नेहमीं लाभ होतो. गुरुकृपेच्या छत्राखालीं आम्ही निर्धास्त आहोंत.

वसिष्ठ : राजेंद्र, आज मुद्दाम आलों आहे. याच विचारांना चालना देण्यासाठीं कांहीं अनुष्ठान करण्याचा विचार आहे. निदान एक वर्ष तरी आपली भेट होणार नाहीं.

हरिश्चंद्र : आम्हांला आशीर्वाद असावा. फिरून दर्शन होईपर्यंत गुरुदेवांची स्मृतीच आम्हांला मार्ग दाखवील.

## ३ : महर्षि विश्वामित्रांचा डाव

अभिमानी विश्वामित्र ऋषि स्वर्गाहून आपल्या आश्रमीं परत आले. त्यांचें मन स्वस्थ नव्हतें.

"आपण इंद्रसभेमध्यें प्रतिज्ञा केली खरी, पण हें काम सोपें नाहीं. देवर्षींचें म्हणणें खोटें असणार नाहीं. राजा हरिश्चंद्राला मीहि ओळखतों. तो धर्मात्मा कांहीं सामान्य नाहीं. त्यांतहि त्याला ब्रह्मर्षि वसिष्ठांचें रक्षण आहे. अभिमानाच्या भरीस पडून विनाकारण ही आपत्ति आपण ओढवून घेतली. आतां कसेंहि करून आपला शब्द खरा केला पाहिजे. पण करावें कसें? हं प्रथम तपोनिधि वसिष्ठांपासून त्याला दूर केलें पाहिजे. मग? हं—हें ठीक होईल." असा विचार करून विश्वामित्र एका राक्षसाकडे गेले. तो राक्षस अत्यंत बलवान तसाच मायावी होता. तो इच्छेप्रमाणें

कोणतेंहि रूप घेऊं शकत असे. त्यानें विश्वामित्रांना मदत करण्याचें कबूल केलें आणि प्रचंड डुकराचें रूप घेऊन तो अयोध्येकडे निघाला.

अयोध्येला राजदरबार भरला होता. राजर्षि हरिश्चंद्र सिंहासनावर विराजत होता. मंत्री आपआपल्या कामांचे अहवाल देत होते. इतक्यांत नगररक्षकांनीं येऊन मुजरे केले. मंत्र्यांनीं आपलें बोलणें थांबविलें. नगररक्षकांस आपला अर्ज सुनावण्यास परवानगी मिळाली.

"राजराजेश्वरांचा विजय असो. एक अतिभयंकर डुक्कर आपल्या उपवनांत शिरला आहे आणि त्यानें त्याचा पुरा विध्वंस केला आहे. त्याला मारण्याचे आम्हीं खूप प्रयत्न केले, परंतु आम्हांपैकींच अनेकांना त्यानें लोळविलें. त्याच्यासमोर जाण्याची कोणालाहि हिंमत होत नाहीं." त्यांनीं हात जोडून निवेदन केलें.

राजा हरिश्चंद्रानें आपला घोडा आणण्याचा हुकूम केला आणि आपलें धनुष्य सज्ज करून तो निघाला. शिकारीला निघतांना त्यानें आपले खास शिकारी सैनिक बरोबर घेतले.

तो उपवनाच्या तोंडाशीं आला; तेव्हां ज्याचे डोळे पेटत्या निखाऱ्यासारखे लाल आहेत असा तो मस्त डुक्कर एक भयानक आरोळी ठोकून मुसंडी मारीत थेट त्याच्याच दिशेनें धांवला. राजा हरिश्चंद्रानें त्याच्यावर अनेक बाण मारिले. परंतु त्या चपळ आणि मायावी डुकरानें ते सर्व चुकविले. तरीहि हरिश्चंद्राच्या शरसंधानामुळें डुकराला पुढें घुसतां येईना. इतकेंच काय, पण कांहीं बाण लागून तो जखमी झाला व पळत सुटला. राजानें त्याच्या पाठीं आपला घोडा फेंकला. तो पर्वतासारखा धिप्पाड डुक्कर वायुवेगानें दौडत होता. हरिश्चंद्रानेंहि त्याची पाठ सोडली नाहीं. त्याला चुकवीत, फसवीत त्या वनवराहानें अयोध्येपासून पुष्कळच दूर नेलें. शेवटीं तो एका घनदाट जंगलांत शिरला. तेव्हां हरिश्चंद्रानेंहि आपला घोडा त्या जंगलांत घातला.

या वेळेपर्यंत राजा हरिश्चंद्राचे सैनिक फारच पाठीं राहिले होते. हरिश्चंद्र एकटाच त्या घोर अरण्यांत त्या डुकराचा माग

काढीत पुढें घुसत होता. शेवटीं एका जाळींत शिरून तो डुक्कर दिसेनासा झाला.

राजानें पुष्कळ शोध केला, परंतु तो मायावी डुक्कर मुळींच आढळेना. शेवटीं राजा कंटाळला. तो परक्या ठिकाणीं आला होता. त्याचे सैनिक तेथें येऊन त्याला लवकर भेटतील, ही आशा फार थोडी राहिली होती. पाठीं फिरायला त्या दुर्गम वनामध्यें मळलेले रस्ते नव्हते. इतकेंच काय, पण आपण कोठें आहोंत व अयोध्या कोणत्या दिशेला आहे, हें त्याला समजण्यासारखें नव्हतें. अतिश्रमानें तो थकला होता, तहानेनें तो व्याकुळ झाला होता, आणि त्याच्या पोटांत भुकेनें काहूर माजविलें होतें. ती वेळ संध्याकाळची होती आणि त्या निबिड अरण्यांत दिसेनासें झालें होतें.

राजा हरिश्चंद्रानें पाठीं फिरण्याचा प्रयत्न केला, तोंच त्याला एक लहानसें मंदिर आढळलें. जवळच एक स्वच्छ पाण्याचा ओढा वहात होता. राजानें घोड्याला पाणी पाजलें, त्याचें अंग थोपटलें आणि त्याला एका झाडाला बांधलें. त्यानें स्वतः हातपाय धुतले. अमृतासारखें गोड पाणी प्याला. नंतर संध्यावंदन करून तो मंदिरांत आला. भक्तिभावानें त्यानें देवतेला प्रणाम केला आणि तेथेंच तो आडवा झाला. फार श्रम झाले असल्यामुळें त्याला लवकरच गाढ झोंप लागली.

प्रातःकाळीं तो दचकून जागा झाला, त्या वेळीं त्याचा चेहरा अत्यंत चिंताग्रस्त दिसत होता. त्यानें शौचमुखमार्जन आटोपून स्नान केलें. तो संध्यावंदन आटोपणार इतक्यांत विश्वामित्र ऋषि एका वृद्ध ब्राह्मणाच्या वेषांत तेथें हजर झाले.

हरिश्चंद्र त्यांस नमस्कार करून म्हणाला, "मी अयोध्येचा सूर्यवंशीय राजा हरिश्चंद्र आहें. आपण आलां त्यामुळें माझी मोठी चिंता दूर झाली. मी रात्रीं स्वप्नामध्यें आपणांला ही नवखंड पृथ्वी अर्पण केली आहे. हें दान पुरें करण्यासाठीं आपली भेट होणें आवश्यक होतें. आपण तर मला अगदींच अपरिचित.

नांवगांव कांहींच माहीत नाहीं. मग पत्ता कसा काढणार? पण आतां आपण आलां—परमेश्वराची कृपाच ही. आपण हें उदक स्वीकारावें आणि दानाचा विधि पुरा करावा."

विश्वामित्रांनीं राजा हरिश्चंद्राकडून हातावर उदक घेतलें आणि ते म्हणाले, "राजर्षे, मीच प्रतिसृष्टि निर्माण करणारा महर्षि विश्वामित्र आहें. आपलें संपन्न राज्य तूं मला दान दिलेंस. दानशूर सूर्यवंशाला शोभणारीच ही गोष्ट तूं केलीस. त्यामुळें तुझें यश आणि कीर्ति हीं वाढतील. युगानुयुगें लोक तुझें गुणगान करतील. पण दक्षिणा दिल्याखेरीज दान पूर्ण होत नाहीं."



हरिश्चंद्र : आपण हें उदक स्वीकारावें व दानाचा विधि पुरावा.

हरिश्चंद्र : परमतेजस्वी महर्षि विश्वामित्र आपणच? धन्य झालों मी. माझें मागील सात जन्मांचें पुण्य फळाला आलें, म्हणून हा योग घडून आला. तपोधन, आतां मी आपणांला काय दक्षिणा द्यावी?

विश्वामित्र : नरेंद्रा, दाता, दान आणि दान घेणारा यांना

शोभेल अशीच दक्षिणा असली पाहिजे. तुझ्यासारख्या ज्ञात्याला हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

हरिश्चंद्र : मुनिवर, आपण अयोध्येला येण्याची कृपा करावी. येथें विपुल दक्षिणा देऊन मी आपणांस संतुष्ट करीन.

विश्वामित्र : बरें आहे.

त्यांना फार आनंद झाला. सावजाच्या गळ्याभोंवतीं फांस पूर्ण आंवळला म्हणजे पारध्याला आनंद होतो नाहीं का!

## ४ : अयोध्या नगरींत

महर्षि विश्वामित्रानें दाखविलेल्या रस्त्यानें राजा हरिश्चंद्र अयोध्येला परत आला. परंतु त्याचा चेहरा उदास होता. कांहीं-तरी मोठी काळजी त्याला लागली असावी, असें परमसाध्वी राणी तारामतीला वाटलें. ती म्हणाली, “ महाराजांची तब्येत ठीक नाहीं का ? कोमेजलेल्या कमलासारखा महाराजांचा चेहरा म्लान दिसत आहे. मला कारण नाहीं का समजूं शकणार ? ”

हरिश्चंद्र : प्रिये, हें सर्व राज्य मी विश्वामित्र महर्षींना दान दिलें आहे.

तारामती : वा ! ही तर अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. नाहींतर उतारवयांत वनांत जायचें आणि ईशचिंतनांत काळ घालवायचा ही आपल्या थोर रविकुलाची रीतच आहे. लहानग्या रोहिदासाची काळजी नको. तो आपला कुलदीपक पुत्र आहे. स्वतःच्या बाहुबलानें स्वतःसाठीं नवें राज्य तो मिळवील.

हरिश्चंद्र : हृदयेश्वरी, तुझें सदा आनंदी असणारें मुख आणि शुद्ध अंतःकरण पाहून धन्यता वाटते. या महान दानाला कोणती दक्षिणा द्यावी, याचा मी आतां विचार करीत आहे.

तारामती : प्राणनाथ, आपल्यासारख्या समर्थ आणि उदार पुरुषांना याची एवढी चिंता कां वाटावी ? आपला खजिना पूर्ण

भरलेला आहे. अत्यंत तेजस्वी अशीं पृथ्वीमोलाचीं अनेक रत्नें आपणांपाशीं आहेत. कोट्यवधि काळ्या कपिला गायी, वाऱ्या-सारखे चपळ व सुंदर असे अगणित घोडे, रत्नजडित सुवर्णालंकारांनीं सजविलेले लाखों हत्ती आणि शृंगारलेले हजारों रथ आपणांपाशीं आहेत.

हरिश्चंद्र : किती सरळ मनाची आहेस तूं तारामती! हें राज्य जेव्हां मी त्या तेजस्वी ऋषीला दान दिलें, तेव्हांपासून या सर्व वस्तु त्याच्या झाल्या आहेत. आतां यांवर आपला हक्क उरला नाहीं.

तारामती : कांहीं हरकत नाहीं. आपल्यासारख्या विश्वविजयी वीराला चिंता कसली? आपल्या धनुष्याचा केवळ टणत्कार ऐकूनच धनपति कुबेर धनाच्या राशी घेऊन आपल्यापुढें लोटांगण घालीत येईल.

हरिश्चंद्र : अग, कुबेर आमचा स्नेहीच आहे. हे सर्व दिक्पाल आमचे स्नेही आहेत. आम्हांला शत्रु कोण आहेत? आमची सर्वांशीं मैत्रीच आहे. आम्हीं सूर्यवंशीयांनीं युद्धें केलीं तीं देवांच्या मदतीकरतां. मला पैशाची जरुरी आहे, असें कुबेराला कळेल तर तो धांवतच येथें येईल. पण आमचें दान हें धर्मकृत्य आहे. दुसऱ्यानें मेहरबानी करून दिलेलें धन अगर दुसऱ्या-पासून जबरदस्तीनें घेतलेलें धन धर्मकार्यीं वापरणें योग्य नाहीं. त्यापेक्षां धर्मकार्य न केलेलेंच बरें.

तारामती : प्राणनाथ, तर मग हा माझा नवखंड पृथ्वीमोलाचा रत्नहारच द्यावा. आपल्या प्रेमाची खूण म्हणून हा मी हृदयाशीं बाळगीत असतें. आपल्या सत्त्वरक्षणासाठीं हा खर्ची पडल्यास त्याचें सार्थक होईल.

हरिश्चंद्र : अगदींच ग भावडी तूं! या विशाल राज्यामध्यें आपली अशी कांहीं वस्तु आतां राहिली नाहीं. तुझ्या अंगावरील अलंकारच काय, पण आमचीं वस्त्रेंहि आतां आमचीं नाहींत. कालचे कुबेर आपण आज रंक झालों आहोंत.

तारामती : मग हा प्रश्न कसा सोडविणार? आपणांला जर दक्षिणा देतां आली नाहीं, तर एवढें भव्य दान व्यर्थ होणार! सत्त्वहरण झालें तर आपली दुष्कीर्ति होईल आणि दुष्कीर्ति मरणाहून जास्त दुःखद आहे.

तिचा चेहरा उतरला. कंठ दाटून आल्यामुळें तिच्या तोंडांतून स्पष्ट शब्दहि उमटेना. तिला धीर देत राजा हरिश्चंद्र म्हणाला,

"तुझें हृदय फुलासारखें कोमल आहे. पण तूं सत्त्वधीर सूर्यवंशाची कुलवधू आहेस. असा धीर सोडणें तुला शोभणार नाहीं. ईश्वर परमकृपाळू आहे. त्यानें आपणांला अव्यंग आणि निरोगी शरीर दिलें आहे. आपण कष्ट करूं. स्वतःच्या श्रमानें द्रव्य मिळवूं आणि तें दक्षिणा म्हणून देऊं."

इतक्यांत विश्वामित्र ऋषि तेथें आले. त्यांना पहातांच राजा आणि राणी या उभयतांनीं त्यांना वंदन केलें. त्यांना उच्चासनावर बसवून त्यांची पूजा केली. परंतु विश्वामित्रांना धीर धरवत नव्हता.

"राजा, माझ्या दक्षिणेची काय व्यवस्था केलीस?" एखाद्या लोभी सावकारासारखें त्यांनीं कठोरपणें विचारलें.

नम्रपणें राजा हरिश्चंद्र म्हणाला, "ऋषिराज, याच गोष्टीचा आम्ही विचार करीत होतों. आपणांला सारें राज्य दान दिलें. आतां या राज्यांतील साऱ्या वस्तु आपल्या झाल्या आहेत. आम्ही सर्वस्वीं निर्धन बनलों आहोंत."

मध्येंच विश्वामित्र मायावीपणानें म्हणाले, "तर मग दक्षिणेची कांहींच आवश्यकता नाहीं. दुसऱ्यावर जुलूम करून धन उकळणें मला बरें वाटत नाहीं. तुला पाहिजे असल्यास हें राज्यहि मी परत देतों. आम्हां तपस्व्यांना याची काय जरुरी!"

"नाहीं महाराज, दिलेलें दान परत घेणें आमच्या पुरुषार्थाला लांछन आहे. मनुष्य दरिद्री होवो, त्याचे इष्टमित्र त्याचा त्याग करोत, अगर दुर्धर संकटें त्याला भोगावीं लागोत, परंतु त्यानें आपलें सत्त्व सोडूं नये. सत्त्वशीलता मनुष्याचा स्वाभिमान, त्याचा पराक्रम, त्याचें तेज यांची निदर्शक आहे. सुखसंपत्ति

अगर यशापयश यांवर मनुष्याची किंमत अवलंबून नाहीं. ती त्याच्या सत्त्वशीलतेवर आहे. सत्त्व सोडून सुखानें जगण्यापेक्षां अनंत काल दुःसह कष्ट भोगणें बरें." राजा हरिश्चंद्रानें निर्धारानें उत्तर दिलें.

"पण सर्वस्व गेल्यावर आतां तूं माझी दक्षिणा देणार कशी?" त्याच्याविषयीं सहानुभूतीचा भाव आणीत विश्वामित्रांनीं विचारलें.

हरिश्चंद्र : श्रम करून. मुनिराज, श्रम करून आम्ही द्रव्य मिळवूं आणि आपली दक्षिणा देऊं.

विश्वामित्र : काय! राजा, तुम्ही श्रम करणार? अतुल ऐश्वर्याचा स्वामी तूं; सर्व सुखें तुझ्यापुढें हात जोडून उभीं आहेत. युद्ध आणि शिकार यांखेरीज अन्य श्रम तुला माहीत नाहींत; तो तूं द्रव्य मिळविण्यासाठीं श्रम करणार?

हरिश्चंद्र : होय ऋषीश्वर, मी श्रम करणार. इतकेंच काय, पण ही माझी प्रिय राणी तारामती आणि लाडका पुत्र रोहिताश्वहि श्रम करणार.

विश्वामित्र : राजेंद्रा, फिरून विचार कर. जिच्या सेवेसाठीं हजारों दासी सदा तत्पर असतात, त्या तुझ्या राणीला तूं श्रम करावयास लावणार? निर्मल पाण्यांत प्रफुल्ल कमल जसें शोभून दिसतें, त्याप्रमाणें सुखशय्येवर शोभणारी तुझी तारामती श्रम करणार? खेळांतील श्रमांखेरीज अन्य श्रम ज्याला माहीत नाहीं, तो सुकुमार रोहित पैसे कमविण्यासाठीं मेहनत करणार? नाहीं, नृपश्रेष्ठा, तुम्ही लोक कष्ट करण्यासाठीं नाहीं, तर ऐश्वर्य भोगण्यासाठीं जन्मलां आहांत. सेवा करण्यासाठीं नाहीं; सेवा घेण्यासाठीं तुमचा जन्म आहे. या तत्त्वज्ञानाच्या गोष्टी पुरे कर आणि आपलें दान परत घे.

हरिश्चंद्र : महर्षे, 'चित्ते वाचि क्रियायां च महतामेकरूपता।' (जे थोर आहेत त्यांचे विचार, उच्चार आणि आचार एकरूप असतात; त्यांत फरक होत नाहीं.) एक वेळ सूर्य आपलें स्थान

सोडील; समुद्र मर्यादा उल्लंघील आणि हिमालय डोलूं लागेल. परंतु अयोध्येचा सूर्यवंशांतील राजा हरिश्चंद्र आपलें वचन फिरवणार नाहीं.

विश्वामित्र : नृपोत्तमा; तूं धन्य आहेस! आपल्या थोर रविकुळाचें तूं भूषण आहेस. कस्तुरीसारखाच तुझा कीर्तिपरिमलहि सर्वत्र पसरेल. राजर्षे, यामध्यें मला आणखी कांहीं अडचणी आहेत.


हरिश्चंद्र : मुनीश्वर, आणखी आम्हीं काय करावें?

विश्वामित्र : नृपते, तूं प्रजावत्सल आहेस. म्हणून तुझ्या प्रजेचीहि तुझ्यावर अनन्यभक्ति आहे. तूं येथें राहिलास तर हें राज्य चालवितांना लोकांकडून अडथळे होतील. यासाठीं हें राज्य सोडून तूं बाहेर जावें.

हरिश्चंद्र : अयोध्या–माझी प्रिय मातृभूमि. अयोध्या सोडून बाहेर जाऊं? ठीक आहे. तपोधन, ठीक आहे. या सप्तद्वीपा वसुंधरेवर माझें राज्य होतें. समुद्रानें वेष्टिलेली ही पृथ्वी मी आपल्या स्वाधीन केली आहे. फक्त भगवान त्रिपुरारीचें निवासस्थान काशीक्षेत्र स्वतंत्र आहे. आम्ही तेथें जाऊं. हे प्रिय मातृभूमि, आज दुर्दैवानें आम्ही तुझा प्रेमळ सहवास सोडून दूरदेशीं जात आहोंत. तूं आम्हांला जन्म दिलास, आपल्या अंगावर पाजून लहानाचें मोठें केलेंस, बालपणीं तुझ्याच अंगावर खेळलों, तरुणपणीं पराक्रमाच्या प्रेरणा तुझ्याचकडून मिळाल्या. आज तुझ्या पवित्र पायांपासून दूर जात आहोंत. तुझ्या सेवेला अंतरत आहोंत. परंतु तूंच सत्यपालनाचें शिक्षण दिलेंस. सत्यच सर्व मानवी व्यवहाराचा खरा आधार आहे. सत्यच धर्माचें मूळ असून, सत्यावरच जग टिकून आहे. तूंच शिकविलेल्या या सत्याच्या उपासनेची आज कसोटी आहे, तुझ्या अन्नाला जागून, तुझ्या पूज्य पायांना स्मरून ही कठीण परीक्षा आम्ही उतरूं. आम्ही कोठेंहि असलों तरी तुझी दिव्य मूर्ति आमच्या हृदयांत

सदा प्रकाशित राहील. त्या प्रकाशांत आम्हांला आमचा मार्ग दिसेल. ऋषिराज, आजच आम्ही वाराणसीला जावयास निघतों.

विश्वामित्र : राजन्, तुम्ही वाराणसीला असणार आणि श्रम करून धन मिळविणार; मग मी येथें राज्य पाहूं, कीं तुझ्याकडून दक्षिणा मिळविण्यासाठीं तिकडे खेपा घालीत बसूं? कांहीं मुदत ठरवशील कीं नाहीं?



पितृतुल्य राजा सर्वस्वाचें दान करून राज्य सोडून चालला.

हरिश्चंद्र : ऋषिवर्य, आपणांला त्रास व्हावा असें मला बिलकुल वाटत नाहीं. मला आपण एक महिन्याची मुदत द्यावी. मग प्रसंगीं स्वतःला विकून आम्ही आपलें ऋण फेडूं.

सत्त्वधीर राजा हरिश्चंद्र, सतीशिरोमणि राणी तारामती आणि राजकुमार रोहिताश्व यांनीं आपल्या अंगांवरील सर्व राजचिन्हें उतरलीं, रत्नजडित अलंकार काढले, आणि राजसी पोषाख ठेवून वनवासी लोकांसारखीं वल्कलें धारण केलीं.

त्यांनीं आपल्या कुलदेवतेला वंदन केलें आणि राजप्रासादांतून बाहेर पडून वास्तुदेवतेला नमस्कार केला.

या वेळपर्यंत मंत्रिमंडळ, नोकरचाकर, अधिकारी, आणि गांवांतील सर्व प्रजाजन यांमध्यें ही बातमी वणव्यासारखी पसरली. खरोखर त्यांचे प्राणहि वणव्यामध्यें सांपडलेल्या प्राण्यांसारखे कासावीस झाले. ती सर्व मंडळी शोकाकुल होऊन राजप्रांगणामध्यें जमा झाली. एवढी भव्य अयोध्यानगरी, परंतु शहरांत अगदीं शुकशुकाट झाला. लहानथोर, स्त्रीपुरुष, गरीब-श्रीमंत सर्व लोक राजदर्शनासाठीं राजप्रांगणांत जमले होते. त्या भव्य लोकसागरावर दुःखरूपी लाटा उसळत होत्या. राजा हरिश्चंद्रानें आजवर त्यांचें पुत्रवत् पालन केलें होतें. आज तो त्यांचा थोर पितृतुल्य राजा सर्वस्वाचें दान करून त्यांना सोडून चालला होता. आयुष्यांत फिरून त्याचें दर्शन होईल का? कोणीं सांगावें! तो निघून गेल्यावर त्यांच्या सुखदुःखांची काळजी कोण वाहील? त्यांच्या कल्याणासाठीं आपुलकीनें कोण झटेल? शोकानें हेलावणारा तो जनसागर राजा हरिश्चंद्राकडे आकर्षिला गेला होता. भरतीच्या वेळीं समुद्र वाटेंत येईल त्याला उडवून देतो; अगदीं तसाच तो जनसागरसुद्धां महर्षि विश्वामित्रांना अवमानीत होता.

आपल्या प्रिय प्रजाजनांना पाहून राजा हरिश्चंद्राचें हृदय भरून आलें. त्यानें कांहीं काळ त्यांना एकटक पाहून घेतलें. फिरून त्यांना भेटावयास मिळणार नाहीं, म्हणून जणूं तो त्यांना आपल्या डोळ्यांत सांठवून घेऊं इच्छीत होता.

लोकांच्या जयघोषांनीं आकाश भरून गेलें, राजा हरिश्चंद्रानें लोकांना शांत केलें व तो म्हणाला,

"तुमचें आमच्यावर अनन्यसाधारण प्रेम आहे, याबद्दल आम्हांला धन्यता वाटते. हें राज्य आतां महर्षि विश्वामित्रांच्या स्वाधीन केलें आहे. त्यांच्या आज्ञा ऐकत जा. आजपर्यंत आपल्या मायभूमीसाठीं झटलां; यापुढेंहि तसेंच झटत जा. एकमेकांना बंधुभावानें मदत करा आणि सर्वांनीं सुखी व्हा. आम्ही कोठेंहि असलों, तरी तुम्हांला विसरणार नाहीं."

म. गां. सं. ठाणें, वाचनालय
विभाग.

राजाचा हा थोरपणा पाहून लोकांना दुःखाचा जास्तच उमाळा आला. कित्येकांना तर रडूं आवरेना. कांहींजण विश्वामित्रांपाशीं गेले. त्यांना पाहिजे तितकें द्रव्य देण्याची त्यांनीं तयारी दर्शविली. परंतु राजा हरिश्चंद्रावरील त्यांचें प्रेम पाहून विश्वामित्र चिडले आणि रागानें म्हणाले, "मूर्खांनो, कोणाचें द्रव्य तुम्ही मला देणार? हें राज्य माझें आहे. या राज्यांतील तुमच्यापाशीं असलेली प्रत्येक चीजवस्तु माझी आहे. राजा, लवकर आटप. यापुढें एक क्षणहि मी तुला येथें राहूं देणार नाहीं."

मोठ्या कष्टानें हुंदके आवरीत आणि पुशीत जड अंतःकरणानें लोक शरयू नदीपर्यंत त्या उदार प्रेमळ राजकुटुंबाला पोहोंचविण्यास गेले. ते म्हणाले,

"महाराज, आपण आम्हांला पित्याच्या ठिकाणीं आहांत. आम्हांला कुमार रोहिताश्वासारखेंच समजा. आम्ही आमचा भार तुम्हांवर पडूं देणार नाहीं. आजपर्यंत जसे आपण सुखदुःखाचे वांटेकरी झालों, तसेच अखेरपर्यंत राहूं."

यावर राजा हरिश्चंद्र म्हणाला, "या तुमच्या प्रेमाचे आम्ही कसे उतराई होऊं! परंतु आतां विश्वामित्र ऋषि तुमचे राजे आहेत. त्यांना सोडून येणें हा राजद्रोह होय. तसेंच अयोध्येचा, आपल्या मायदेशाचा त्याग करणेंसुद्धां अयोग्य आहे. आमच्या इच्छेला तुम्हीं मान द्यावा व परत फिरावें."

## ५ : काशीक्षेत्राच्या मार्गावर

अयोध्या ते काशी–किती लांबीचा प्रवास! वाटेंत किती डोंगर पालथे घालावयाचे! किती जंगलें ओलांडावयाचीं! किती नद्या पार जावयाचें! हा सर्व प्रवास त्यांना पायीं करावयाचा होता. त्या काळीं आजच्यासारखे रस्ते नव्हते. पुष्कळ ठिकाणीं पाऊलवाटाहि नव्हत्या. फक्त एक दिशा धरून चालावयाचें. अशा स्थितींत ते रस्ते चुकून किती भटकले! वाटेंतील जंगलें

तर फारच भयानक. त्यांत एकदां गुरफटलें कीं चक्रव्यूहांत सांपडल्यासारखें वाटे. कांहीं ठिकाणीं जंगल इतकें दाट असे कीं, त्यांत सूर्यकिरणांचें दर्शनहि होत नसे. त्यांतच कांटेरी वेलींचीं जाळीं गुरफटवीत. रस्त्यांवरील कांट्याकुट्यांनीं त्यांचे पाय रक्तबंबाळ झाले, आणि कांटेरी वेली लागून त्यांच्या वल्कलांच्या चिंध्या झाल्या. मधूनमधून अस्वलांचें गुरगुरणें, लांडग्यांच्या आरोळ्या, क्रूर वाघांच्या डरकाळ्या आणि सिंहाच्या भीतिप्रद गर्जना ऐकूं येत. तिकडे ध्यान द्यावें तर सळसळत जाणाऱ्या सापांचे फूत्कार दचकवीत. कांहीं ठिकाणीं तर अक्राळ-विक्राळ दिसणारे आणि कुऱ्हाडी पाजळीत भटकणारे वाटमारे घाबरवीत. सामान्य माणसांचे प्राण भीतीनेंच जावयाचे. परंतु धीरगंभीर हरिश्चंद्र, तारामती आणि रोहिदास शांतपणें चाललीं होतीं.

जंगल संपलें तर सपाट प्रदेश लागे; परंतु तेथें हिरवें गवतहि दृष्टीस पडत नसे. जिकडे तिकडे अगदीं भयाण रुक्षता. ते उन्हाळ्याचे दिवस होते. रखरखीत ऊन पडून हवा तापली म्हणजे सांवलींतून बाहेर पडणें कठीण होई. वरून सूर्य जणूं आग ओकीत होता आणि खालून जमीन उष्ण वाफेचे फवारे मारीत होती. वारा वाहूं लागला म्हणजे शरीराला गरम हवेचे चटके असह्य होत. वरचेवर चक्कर येऊन पडायला होणार, असें वाटे. त्यांच्या घशाला कोरड पडली होती पण तेथें पाण्याचा पत्ताच नव्हता. अति उष्णतेमुळें दूरवर पाण्याचा भास होई. ते फार जलदीनें जात. परंतु तें पाणी नेहमीं पहिल्या-इतकेंच दूर वाटे. मग तें मृगजळ होतें हें ध्यानीं येऊन त्यांची निराशा होई, त्यांना वाटे कीं, दैव आपली क्रूर थट्टा करीत आहे.

विश्वामित्रांनीं त्यांची पाठ सोडली नव्हती. त्यांनीं गरीब ब्राह्मणाचें रूप घेतलें, आणि हरिश्चंद्राजवळ येऊन काकुळतीनें तें म्हणाले—

" हे महाभागा, तूं फार दयाळू आहेत. या आगींतून मी, माझी पत्नी आणि एक बालक प्रवास करीत आहोंत. परंतु पायांत पादत्राणें नसल्यामुळें कांहीं घडगत दिसत नाहीं. तुम्हीं मेहेरबानी केल्यास ब्राह्मणांस जीवदान दिल्याचें पुण्य तुम्हांस लाभेल. "


त्याच क्षणीं दानवीर हरिश्चंद्रानें आपल्या पायांतील जोडे काढून ब्राह्मणास दिले. उदार स्वभावाच्या राणी तारामतीनें आणि रोहिताश्वानेंहि आपापलीं पायतणें काढून ब्राह्मणाच्या स्वाधीन केलीं. परंतु आतां त्यांचे पाय पोळूं लागले; त्यांना फोड आले. पुढें पाऊल टाकणेंहि कठीण झालें. पण महर्षि विश्वामित्रांची दक्षिणा द्यावयाची आहे या विचारानें मनाचा हिय्या करून उसनें बळ आणून तीं चाललीं होतीं.

परंतु सुकुमार रोहिताश्वाला ती उष्णता सहन झाली नाहीं. तो मटकन खालीं बसला. पाण्याबाहेर मासा काढला असतां त्याची जी अवस्था होते, तीच स्थिति लहानग्या रोहिताश्वाची झाली.

" माझ्या बाळा, नाहींच तुला सहन होणार ही आग. ये हो, घेतों मी तुला उचलून. माझ्या बाळानें आमच्याकरतां किती सहन केलें! आणि इतकें झालें तरी एका शब्दानेंहि तक्रार केली नाहीं. किती गुणी आहे माझा बाळ! " असें म्हणून हरिश्चंद्रानें त्याला उचलून घेतलें. उन्हाची झळ लागून तो अत्यंत विकल झाला होता. त्यानें प्रेमळ पित्याच्या खांद्यावर मान टेकली. कांहीं वेळानें एक घर दिसूं लागलें. पुन्हां मोठ्या आशेनें झपझप पावलें टाकीत ती मंडळी चालूं लागली. " आतां आपण जवळ आलों आहोंत. थोड्याच वेळांत त्या सांवलींत पोहोंचूं, क्षणभर तेथें विश्रांति घेऊं, घोटभर पाणी पिऊं आणि पुढचा मार्ग धरूं," असे मनाचे मांडे खात ते तेथें पोहोंचले. त्यांना फार आनंद झाला. पण—

" अरे, हें तर अन्नछत्र आहे! क्षत्रिय वीर अन्नछत्रांतील अन्न घेत नाहींत; पाणपोयींतील पाणी पीत नाहींत. "

अतिकष्टानें मन मारून त्यांनीं पुढचा रस्ता धरला.



" येथें या. जरा विश्रांति घ्या. "

तें अन्नछत्र म्हणजे विश्वामित्रांची मायाच होती. एका वृद्ध ब्राह्मणाच्या वेषांत ते तेथें हजर होते. हरिश्चंद्राला पुढें जाताना पाहून ते कांहींसे निराश झाले. पण धीर धरून ते पुढें आले आणि म्हणाले,

" हे सभ्य गृहस्थहो, आपण सर्व मंडळी फार थकलेली दिसतां. येथें या; जरा विश्रांति घ्या. हातपाय धुवून भोजन उरकून घ्या. त्या पहा, आंत पंक्ति बसल्या आहेत. मग सावकाश आपल्या मार्गाला लागा. आपण थोर घराण्यांतील दिसतां! आपली सर्वप्रकारें योग्य व्यवस्था ठेवली जाईल."

" द्विजराज, आपण फार उदार आहांत. पण आम्ही क्षत्रिय असल्यामुळें या अन्नछत्रांतील अन्न आणि पाणी आम्ही घेऊं शकत नाहीं. माफ करा." हरिश्चंद्रानें नम्रपणें सांगितलें.

तेव्हां विश्वामित्र म्हणाले, " महाराज, या प्रखर उन्हांतून हें

विस्तीर्ण मैदान ओलांडून आपण आलांत. आपला चेहरा किती व्याकुळ झालेला दिसतो! जरा या बाईसाहेबांकडे पहा. जन्मामध्यें कधीं त्या घराबाहेर पडल्या नसतील. त्यांना हे श्रम, हें ऊन कसें सहन होईल? त्यांचें तोंड पहा कसें कोमेजलें आहे तें! या कोंवळ्या बालकाकडे तर पहावतच नाहीं. याची स्थिति अगदींच केविलवाणी झाली आहे. अल्या गृहस्था, यांच्यासाठीं तरी आपला अभिमान जरा बाजूला ठेव आणि आंत चल."

"महाराज, 'त्यजत्यर्ककरैस्तप्तं हिमं देहं न शीतताम्'— प्रखर उन्हामुळें बर्फ आपला देह सोडतें-वितळतें; पण आपला स्वधर्म-थंडपणा सोडीत नाहीं. निखारा विझून कोळसा होईल. परंतु तो निखारा असेपर्यंत उष्णता देणें सोडणार नाहीं. तसेंच वेळ आल्यास आम्ही मृत्यु पतकरूं, पण आपला बाणा आम्ही सोडूं शकत नाहीं." असें स्पष्टपणें सांगून हरिश्चंद्र पुढें चालूं लागला.

इतकें झालें तरी विश्वामित्रांनीं माघार घेतली नाहीं. राजा हरिश्चंद्र, तारामती आणि रोहिताश्व कांहीं पुढें गेल्यावर त्यांना एक घनदाट जंगल लागलें. त्या जंगलाच्या मधोमध ते पोहोंचले; इतक्यांत एकाएकीं रोहिताश्व ओरडला, "बाबा, आग!" खरेंच त्या जंगलाच्या चोहोंबाजूंना भयंकर आग लागली होती. धडाडून वृक्ष पेटत होते आणि कडाडून कोसळत होते. पक्षी किलकिलाट करून बाहेर पडण्याची धडपड करीत होते, परंतु बिचारे आगींत कोसळून मृत्युमुखीं पडत होते. क्रूर आणि भयानक श्वापदें आपले प्राण वांचविण्यासाठीं इकडून तिकडे सैरावैरा पळत होतीं. पुराच्या लोंढ्याप्रमाणें आगीचे लोळ जवळजवळ येत होते. त्या आगीच्या ज्वाळा मृत्यूच्या लालचावलेल्या जिभाच वाटत!

"बाळ, घाबरूं नकोस. क्षत्रियाचा बच्चा मृत्यूला डरत नसतो. हा अग्नि खुशाल आपणांला भक्षण करो. दुःख एकाच गोष्टीचें वाटतें, त्या ब्राह्मणोत्तमाची दक्षिणा मी देऊं शकलों नाहीं. परंतु हे परमेश्वरा, जर आजपर्यंत मी सत्यानें वागलों असेन, माझें चरित्र शुद्ध असेल, मी कांहीं दानधर्म केला असेल, आणि

वडिल, ब्राह्मण व देव यांची पूजा केली असेल, तर पुढील जन्मीं ही स्मृति राहो. म्हणजे त्या जन्मामध्यें मी हें ऋण फेडीन."

कुमार रोहिताश्व आणि राणी तारामती यांचा हात धरून अगदीं शांतपणें हरिश्चंद्र उभा राहिला. अग्नीच्या ज्वाळा पुढें पुढें येत होत्या. अंगाचा दाहहि होऊं लागला. ज्वाळा आणखी जवळ आल्या. आतां तर–अरे देवा! सत्याचे उपासक ते तीन जीव भस्मसात होणार? अरे, पण हें काय? सत्त्वशील हरिश्चंद्राच्या शरीराचा स्पर्श होतांच तो सारा वणवाच विझला! आतां जंगल तरी कोठें आहे? अखेर प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्रांची माया निष्फळ ठरली.

## ६ : गुलामांच्या बाजारांत

राजा हरिश्चंद्राचा अयोध्या ते काशी हा प्रवास म्हणजे एक दिव्य होतें. आपल्या सत्त्वशीलतेनें तो त्यांतून तावूनसुलाखून बाहेर पडला. तीं तिघें काशीला पोहोंचलीं, तेव्हां त्यांचा आनंद गगनांत मावेना. प्रथम तीर्थक्षेत्रीं जाऊन त्यांनीं त्या पवित्र जलामध्यें स्नान केलें आणि आपला मूळपुरुष जो सहस्ररश्मि भगवान सूर्यनारायण त्याला अर्घ्य दिलें. तेथून तीं पतितपावन काशिविश्वेश्वराच्या मंदिरांत गेलीं. त्यांनीं अत्यंत भक्तिभावानें साष्टांग नमस्कार घातले आणि सद्गदित होऊन त्याची प्रार्थना केली. नंतर जड अंतःकरणानें तीं बाहेर आलीं. प्रवासाचे श्रम, त्यांत भोगलेले अनंत कष्ट आणि भूक यांमुळें त्यांच्यामध्यें कांहीं त्राण उरलें नव्हतें. तरीहि आपल्या कर्तव्यामध्यें तीं अढळ होतीं.

राजा हरिश्चंद्र भगवान काशीविश्वेश्वराच्या मंदिरांतून बाहेर येतो तोंच लोंचट सावकारासारखे विश्वामित्र ऋषि तेथें हजर! त्यांना पाहातांच त्या तिघांनींहि वंदन केलें. नंतर राजा हरिश्चंद्र नम्रपणें म्हणाला—

" ऋषिराजा, आज माझ्यासाठीं येथवर येण्याचे कष्ट आपणांस काढावे लागले."

" पण राजा, आज शेवटचा दिवस आहे. आज मला दक्षिणा मिळालीच पाहिजे. दक्षिणा घेतल्याखेरीज मी येथून जाणार नाहीं. " विश्वामित्रांनी निर्धारानें सांगितलें. त्या वेळीं ते चंद्राला गिळूं पहाणाऱ्या राहूसारखे दिसत होते. खरोखर, ज्याच्याकडे कर्जापायीं सावकाराचा तगादा नाहीं तो सुखी !

त्यांच्यासह तीं तिघें काशींतील बाजारांत आलीं. अयोध्येचा राजा वीरश्रेष्ठ हरिश्चंद्र नवखंड पृथ्वीचा सम्राट्; पण सत्त्वरक्षणासाठीं आज स्वतःला विकून घेण्याकरतां काशीच्या बाजारांत तो उभा राहिला. सूर्य–चंद्राला जिचें दर्शन दुर्लभ, ती अयोध्येची राजमहिषी तारामती भर बाजारांत स्वतः विकून घेण्यासाठीं हजर झाली. ज्याच्या लहानपणीं त्याला घेण्यासाठीं राजेरजवाडे हात पसरून आतुर असत, तो अयोध्येचा युवराज रोहिताश्व सत्त्वरक्षणासाठीं आज गुलाम होण्यास तयार झाला.

एका नाक्यावर उभा राहून हरिश्चंद्र विनवीत होता. ' आपणांला विकत घ्या ' असें सांगत होता. जसजसा वेळ जात होता, तसतसा तो अधीर होत होता.

विश्वामित्र ऋषि सारखे लावून बोलत होते.

" राजा, मला किती तिष्ठत ठेवणार आहेस ? त्यापेक्षां सरळ नाहीं म्हण. मी परत जातों. तुला इतका त्रास करून घ्यावयास नको. पाहिजे तर तुझें राज्यहि परत देतों. "

संध्याकाळ होत आली. राजा हरिश्चंद्र जवळजवळ निराशच झाला होता. इतक्यांत कालकौशिक नांवाचा म्हातारा ब्राह्मण आला. बरोबर त्याचा शिष्य होता. त्यानें एक कोटी सुवर्णमुद्रा देऊन तारामतीला विकत घेतलें. तेव्हां ती सती अत्यंत विनयानें म्हणाली,

" आपण ब्राह्मण, भूदेव; मला पित्याच्या ठिकाणीं आहांत. मी तुमची दासी असलें, तरी मुलीसारखीच माना. दुर्दैवानें आमची अशी स्थिति झाली असली, तरी मी कुलवधू आहें. मी परपुरुषांशीं बोलत नाहीं आणि दुसऱ्याचें उष्टें खाऊं शकत नाहीं. "

पतीच्या सत्त्वरक्षणासाठीं आज अयोध्येची महाराणी

दुसऱ्याची दासी झाली. आज आयुष्यांत प्रथमच आपला पति आणि पुत्र यांना सोडून तिला दूर जावें लागत होतें. साहजिकच दुःखाचे उमाळे तिला आवरतना. छोटा रोहिताश्व तर तिला अगदीं बिलगला.

" आई, मला सोडून कोठें चाललीस ? माझ्यावर रागावलीस का ? माझ्यामुळें तुम्हांला फार त्रास झाला. अयोध्येंतून येतांना तूं फार थकली होतीस, तरीहि मला कडेवर घेतलेंस. माझा असा त्रास तुला सहन होत नाहीं का ? आई, मला बरोबर घेऊन चल. मी आतां त्रास देणार नाहीं. कधीं हट्ट करणार नाहीं. रुसणार नाहीं की रागावणार नाहीं. मला भूक लागली, असें कधीं म्हणणार नाहीं. " आईच्या तोंडाकडे केविलवाणें पहात तो म्हणाला.

जवळच कालकौशिकाचा शिष्य कौंडिण्य होता. त्यानें धक्का मारून लहानग्या रोहिताश्वाला त्याच्या आईपासून दूर केलें. एकेकाळचा अयोध्येचा युवराज असलेला रोहिताश्व; त्याला हा अपमान अगदीं असह्य झाला. मातापिता यांचा आधार मुलांना वाटत असतो. त्यांच्या जोरावर तीं साऱ्या दुनियेला तुच्छ समजण्यास तयार होतात. कुमार रोहिताश्वाचे आईबाप तेथेंच होते. त्यांच्यासमक्षच हा त्याचा अपमान झाला. म्हणून तो त्याला विशेष भासला. रागानें त्याचे डोळे लाल झाले. परंतु इतक्यांत आपल्या मातापित्यांची स्थिति त्याच्या ध्यानांत आली. त्यानें शिकस्तीनें आपला राग गिळला आणि तो दीनपणें हरिश्चंद्राकडे पाहूं लागला. सहस्र विंचवांनीं एकदम दंश करावे त्याप्रमाणें लाडक्या रोहिताश्वाच्या दीनमुद्रेनें हरिश्चंद्राला दुःख झालें. पण तो धैर्याचा महामेरु होता. तो म्हणाला,

" ब्राह्मणकुमार, तुम्ही लोक देवांसारखे पूज्य आहांत. या अबोध बालकावर राग करण्यांत काय अर्थ आहे ? "

साध्वी तारामतीचें मातृहृदय कळवळलें. ती कालकौशिकाला विनवीत म्हणाली, " आपण अत्यंत दयाळू आहांत. आम्हां मायलेंकरांची ताटातूट करूं नये. हरिणी-पाडसांची भेट घडविण्याचें पुण्य आपण संपादावें. या लेंकरालाहि मजबरोबर घ्यावें. "

रोहिताश्वाला आतां धीर आला. तो म्हणाला, "आजोबा! होय, आपणच आतां माझे आजोबा आहांत. मला आपल्याकडे न्या. मी पूजेसाठीं फुलें आणि, दर्भ आणीन, समिधा आणीन. आपण सांगाल तें काम करीन. माझ्यावर कृपा करा आणि माझ्याबद्दल माझ्या वडिलांना कांहीं द्या. तेवढीच त्यांना ऋण-मुक्त होण्यास मदत होईल."

बालक रोहिताश्वाच्या या करुण आणि लडिवाळ वाणीनें तो वृद्ध ब्राह्मण कळवळला. त्यानें रोहिताश्वाबद्दल पन्नास लाख सुवर्णमुद्रा दिल्या.

कितीहि धीराचा मनुष्य असला तरी आपल्या प्रियजनांचा वियोग त्याला असह्य होतो. आपत्तिकालामध्यें तर तो विशेष दुःख-दायक वाटतो. परिस्थिति कितीहि कठीण असो, परंतु त्या वेळीं आपलीं माणसें जवळ असतील तर मनाला एक-प्रकारचा धीर वाटतो. थोडेसें समाधान वाटतें. परंतु वियोगामुळें मुळांत दुःख, वर एकलेपणाचा विरस, त्यांत आप्तजनांच्या चिंतेची भर. ही स्थिति अगदीं दुःसह असते.



...परंतु त्यांचें पाऊल पुढें पडेना

त्यामुळें संकटांना तोंड देण्याची मनुष्याची इच्छाच नाहींशी होते. तो दुबळा बनतो.

हरिश्चंद्र, तारामती आणि रोहिताश्व यांनीं अत्यंत बाणेदारपणें सर्वस्वावर पाणी सोडलें व अयोध्येहून काशी गांठली. पण आज एकमेकांना सोडून जातांना त्यांचें धैर्य थोडेंसें खचलें. त्यांच्या डोळयांवाटे अश्रुधारा वाहूं लागल्या. शेवटीं कालकौशिक जबरदस्तीनें तारामती आणि रोहिताश्व यांना घेऊन गेला.

राजा हरिश्चंद्राला वंदन करून सती साध्वी तारामती आणि कुमार रोहिताश्व निघालीं. परंतु त्यांचें पाऊल पुढें पडेना. दृष्टि सारखी मागें हरिश्चंद्राकडे लागली. त्यालाहि गडभडून आलें. त्याच्या मनावर त्या प्रसंगाचा एवढा परिणाम झाला कीं, त्याची चैतन्यशक्तीच जणूं नष्ट झाली. दगडाच्या पुतळयासारखा तो निश्चल, निष्पंद उभा राहिला. त्याच्या शून्य चेहऱ्याकडे पाहिल्यावर खुद्द विश्वामित्रांनाच वाईट वाटलें. हरिश्चंद्राच्या सत्त्वशीलतेनें त्यांचा पर्वतासारखा दृढनिश्चयहि क्षणभर ढळला.

"हरिश्चंद्रा, राजर्षे, तुझी सत्यप्रीति आणि दातृत्व पाहून मी संतुष्ट झालों आहें. तुम्हां लोकांचे हे हाल मला पहावत नाहींत. या हालांला मीच कारण आहें याबद्दल मला फार वाईट वाटतें. माझी दक्षिणा मी तुला माफ करतों. हे पैसे परत करतों आणि सुशील तारामती आणि बाळ रोहिताश्वाला सोडून आणतों. तुम्ही सुखानें रहा. राज्यहि परत केलें असतें, पण तूं ते परत घेत नाहींस." राजा हरिश्चंद्राच्या खांद्यावर हात ठेवून विश्वामित्र म्हणाले.

"मुनिराज, आपणांला असें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. सभ्य गृहस्थ कधीं माफी मिळवून देण्यांतून मोकळा होणार नाहीं. आपलें ऋण देणें हें माझें कर्तव्य आहे. मला तें पूर्ण केलेंच पाहिजे." राजा हरिश्चंद्रानें शांतपणें उत्तर दिलें.

यावर विश्वामित्रांनीं विचारिलें, "कां ? राजा, माझ्यासारख्या कठोरहृदयी माणसामध्यें दयेचा अंशहि असणार नाहीं, असें कां तुला वाटतें ?"

हरिश्चंद्र : मुनींद्र, माझ्या मनांत अशी कल्पनाहि येणें शक्य नाहीं. माझे वडील महाराज त्रिशंकु यांना आपणच मदत केली. त्यासाठीं आपण प्रत्यक्ष ब्रह्मदेवाशीं लढा दिला, हें मी विसरलों नाहीं. आपण विश्वाचे मित्र आहांत. विश्वाच्या कल्याणासाठींच आपण आमच्या बुद्धीला चालना देणाऱ्या सूर्याच्या उपासनेचा गायत्रीमंत्र आम्हां सर्वांना दिला. त्या सूर्याचे आपण उपासक, त्याचाच वंशज मी. माझ्याबद्दल आपणांला प्रेम कसें वाटणार नाहीं !

विश्वामित्र : परंतु माझ्यासारख्याकडून माफी घ्यायला तूं तयार नाहींस. गुलामगिरीमध्यें असह्य यातना असतात. ती गुलामगिरी का तुला जास्त पसंत आहे ?

हरिश्चंद्र : नाहीं तपोनिधि, असें नाहीं. आपल्यासारख्यांच्या कृपेचे आम्ही नेहमींच भुकेलेले आहोंत. आपलें कृपाछत्र हा आमचा मोठाच आधार आहे. परंतु कांहीं झालें तरी सत्त्व सोडतां येणार नाहीं. कर्तव्याची उपेक्षा करतां येणार नाहीं. त्यासाठीं सहन कराव्या लागणाऱ्या दुःखांकष्टांना मी नाजुक सुगंधी फुलें समजेन. अपमानाला शेला मानीन.

विश्वामित्र : राजा तुला एवढा अभिमान आहे, तर करच माझी दक्षिणा पुरी. फक्त आतां वेळ किती राहिला आहे तो पहा.

राजा हरिश्चंद्रानें ती रक्कम विश्वामित्रांच्या स्वाधीन केली, परंतु त्यांचें समाधान झालें नाहीं. तेव्हां हरिश्चंद्रानें स्वतःस विकावयाचें ठरविलें. पण गिऱ्हाईकच मिळेना. शेवटीं चांडाळ पुढें आला. राजा हरिश्चंद्राचें सर्वस्व गेलें होतें; वर आतां गुलाम होण्याची पाळी आली. परंतु ज्यांत माणुसकीचा लोप होतो, असें चांडाळाचें-डोंबाचें काम करण्यास तो तयार नव्हता. तेव्हां विश्वामित्र ऋषि रागानें म्हणाले, "राजा, तुला आपलें वचन कांहींतरी बहाणा करून पाळावयाचें नसेल, तर माझा जुलूम नाहीं. परंतु आज सूर्यास्तानंतर मात्र मी येथें रहाणार नाहीं. सूर्यास्ताला आतां अवघी अर्धी घटका आहे. काय करणार तें स्पष्ट सांग."

हरिश्चंद्र : महर्षे, आपण दयानिधि आहांत. मी आपलाच दास होतों. आपलें येणें चुकतें करून घ्यावें.

विश्वामित्र : ठीक आहे. दासानें धन्याची आज्ञा मानिली पाहिजे. मी तुला या चांडाळाच्या हवालीं करतों. आजपासून तोच तुझा धनी. त्याची आज्ञा ऐकत जा.

राजा हरिश्चंद्राबद्दल त्या चांडाळाकडून दोन कोटी सोन्याचीं नाणीं घेऊन महर्षि विश्वामित्र निघून गेले.

आतां विश्वामित्रांचें मनच त्यांना खाऊं लागलें—

"राजा हरिश्चंद्र सत्यवादी आहे. माझी दक्षिणा देऊन त्यानें आपलें सत्त्व राखलें. तो सर्वस्वाला मुकला, असें जग म्हणेल. परंतु ज्याच्यापुढें तिन्ही लोकांच्या संपत्तीची किंमत शून्य आहे, तो आपला बाणा त्यानें कायम राखला.

मीं त्याला राज्यभ्रष्ट केलें; स्वदेशांतून हांकून काढलें; स्त्रीपुत्र विकायला लावलें; आणि स्वतःस डोंबाचा गुलाम होण्यास भाग पाडलें. पण अखेर वचन कोणाचें खरें झालें! दुसरी सृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्रा, तूं हरलास. राजा हरिश्चंद्राचें शील अभंग आहे, नीतिमत्ता अढळ आहे, धैर्य अचल आहे. सत्ता, संपत्ति, शक्ति आणि कीर्ति यांपैकीं एकेक वस्तूच्याहि मनुष्याला मद चढतो आणि तो बिघडतो. परंतु या महापुरुषापाशीं या सर्व दासीसारख्या राबत होत्या. असाच राजा पृथ्वीला शोभतो!

अशा सत्पुरुषाची परीक्षा घेऊन मी त्याचा छळ केला. चंदन घांसलें असतां त्याचा सुगंध जास्तच दरवळतो. त्याचप्रमाणें हरिश्चंद्रासारख्या साधुपुरुषांना कठीण परिस्थिति प्राप्त झाली, तर ती त्यांची कीर्ति वाढविण्यासच कारण होते. जगामध्यें सर्वत्र स्वार्थाकरितां धामधूम चालली आहे. या धुमश्चक्रींत असे महात्मेच गरीब लोकांना आधार देतात. दुनियेमध्यें जी थोडी सुखशांति आढळते, ती अशा सज्जनांमुळें.

विश्वामित्रा, अशा राजर्षींची निःस्वार्थी लोकसेवा, नम्रता आणि विशुद्ध जीवन यापुढें तुझी तामसी तपश्चर्या व्यर्थ आहे.

परंतु खुद्द सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाला हरवणारा मी, प्रतिसृष्टीचा विधाता; त्या वसिष्ठाच्या शिष्यापुढें मस्तक नमवूं? आज माझा पराभव झाला आहे. माझी एवढी दीर्घ तपश्चर्या फुकट गेली. पण म्हणून काय झालें? हरिश्चंद्रानें कोणत्या परिस्थितीमध्यें आपला बाणा कायम राखला, तो मी आपल्या डोळ्यानें पहात आहे. मग मला आपली प्रतिज्ञा पाळतां येऊं नये? देवांना नमवणारा मी; एका मनुष्यापुढें नमूं? नाहीं, मी हरिश्चंद्राच्या सत्त्वाचा अंतच पहाणार. मग शेंडी तुटो वा पारंबी तुटो."

## ७ : गुलामींतील दिव्य

चांडाळानें राजा हरिश्चंद्राला स्मशानाचा रक्षक नेमलें. आतां राजदंडाऐवजीं चांडाळदंड त्याला हातीं घ्यावा लागला. राजवाड्याऐवजीं स्मशानांतच त्याला रहावें लागे. षड्रस अन्नाऐवजीं स्वतःच्या हातानें बनवून कोरडी भाकर त्याला खावी लागे. डोंबानें घोंगडीचें एक फटकूर त्याला दिलें होतें. कमरेला पीतांबराऐवजीं लंगोटा आला. दाढीमिशा वाढल्यामुळें त्याचें रूपहि हळूहळू डोंबासारखें दिसूं लागलें.

त्या स्मशानांत प्रेतें धडाडून पेटत असत. विझलेल्या आगीच्या राखेचे ढीग चोहोंकडे पसरलेले होते, आणि वाऱ्यामुळें ती राख सारखी सगळीकडे उधळे. या उधळणाऱ्या राखेच्या जोडीला अर्धवट जळलेल्या प्रेतांच्या दुर्गंधीमुळें तेथें जाणेंहि असह्य होई. हाडांच्या राशी भयानकता वाढवीत. कुत्र्यांच्या अनेक झुंडी तेथें फिरत असत. प्रेतें खाण्यासाठीं चटावलेल्या कोल्ह्यालांडग्यांच्या झुंडीमुळें जास्तच भीति वाटे. आकाशांत घारीगिधाडें घिरट्या घालीत, तर कावळे झाडावर बसून कावकाव करीत असत. एकेकाळीं समुद्रानें वेष्टिलेल्या अखिल पृथ्वीचा राजा हरिश्चंद्र आतां त्या पृथ्वीवरील मूर्तिमंत नरकामध्यें रहात होता.

त्याला वरचेवर सती तारामती आणि लाडका रोहित यांची आठवण येई, आणि त्यांच्या काळजीनें तो व्याकुळ होई.

"राजवाड्यांतील सुखोपभोग भोगणारीं तीं, माझ्याकरतां सर्वस्वाचें हवन करून गुलामींत राबण्यास गेलीं. मी कष्ट करीन, धन मिळवीन आणि त्यांची सुटका करीन अशी जबर आशा हृदयाशीं बाळगून तीं दिवस मोजीत असतील.

शेंकडों दासदासी जिच्या सेवेला असत, तिला लाजिरवाणें गुलामीचें जिणें जगण्यापेक्षां मृत्यु बरा वाटत असेल. माझ्यावर सर्व आशा ठेवूनच ना ती त्या अत्यंत हीन स्थितींत काळ कंठीत आहे! आणि रोहिताश्व? रात्रीं झोंपेंतहि 'बाबा, बाबा' म्हणून ओरडून उठत असेल. शीतल स्वच्छ पाण्यांत उमलणारें तें नाजुक कमल, दोन प्रहरच्या धगधगत्या उन्हांत दगडावर ठेविलें तर त्याची काय अवस्था होईल? पित्याची शीतल छाया तरी लाभेल का, म्हणून माझ्या वाटेकडे डोळे लावून तो बसला असेल. त्या माझ्या लाडक्याला मीं ह्या परिस्थितींत आहे असें कळलें तर काय वाटेल?" असे विचार सारखे त्याच्या मनांत येत. मग तो हताश होई आणि मृत्यूची आळवणी करी.

पण कांहीं झालें तरी त्यानें आपल्या कामांत कधीं कसूर केली नाहीं. काम चांगलें कीं वाईट, हा प्रश्न वेगळा. परंतु एकदां तें करायला घेतलें म्हणजे मनापासून करायचें, हा सरळ वृत्तीच्या माणसांचा बाणाच. खांद्यावर फाटकी घोंगडी घेऊन आणि हातांतील दांडा आपटीत हरिश्चंद्र अहोरात्र त्या स्मशानांत फेऱ्या घालीत असे. बिचाऱ्याला घटकाभर झोंपहि मिळत नसे. आधींच परिस्थितीमुळें त्याची झोंप नष्ट झालेली. पण जरा विश्रांतीसाठीं तो पडलाच, तर तितक्यांत एकादें प्रेत येई. त्या प्रेताचा कर घेण्याची कामगिरी त्याच्यावर होती. तें प्रेत पुरें जळेपर्यंत त्याला राखण करावी लागे. स्मशानाची झाडलोट करून तें स्वच्छ राखणें, पुरलेलीं प्रेतें उकरून काढण्यासाठीं आणि अर्धवट जळालेलीं प्रेतें

खाण्यासाठीं येणारीं कोल्हींकुत्रीं हांकून लावणें, तेथें जमणारे राखेचे ढीग उपसणें वगैरे कामें त्याला करावीं लागत. या कामांमध्यें तो अगदींच नवखा होता. त्याचें मनसुद्धां अस्वस्थ-दुःखी होतें. परंतु तो आपलें काम वेळच्यावेळीं चोख बजावी. त्यामुळें तो येण्यापूर्वीं तेथें जी घाण आणि भयानकता होती, ती आतां नाहींशी झाली. त्या स्मशानालाहि एक नवीन रूप मिळालें. आपलें काम योग्यप्रकारें अगदीं मनापासून करणें, हाच एक धर्म तो जाणत होता. त्या आपल्या कर्माच्या उपासनेंतच तो आपल्या जन्माचें सार्थक मानी.

तशा स्थितींतहि तो आपलें स्वत्व विसरला नव्हता. आपलें चांडाळाचें कर्म करतांनाहि त्यानें आपलीं स्नान, संध्या व उपासना हीं सोडिलीं नव्हतीं. आपलें अन्न तो कोरडेंच घेई. तें अन्न त्याला स्मशानांतच शिजवावें लागे. तो प्रथम देवाला नैवेद्य दाखवी. नंतर अतिथींचा भाग बाजूला काढून ठेवी. मग स्वतः जेवण करी. कांहीं वेळां तो तोंडांत घांस घेणार, इतक्यांत भिकाऱ्याच्या वेषांत विश्वामित्र तेथें जात. त्यांची पाठपोट एक झालेली ती दीनमूर्ति पाहून दयाळू हरिश्चंद्र सर्वच अन्न त्याला देई, आणि आपण हरि हरि म्हणत पाणी पिऊन दिवस घालवी. अशा हालअपत्तींत त्यानें सुमारें एक वर्ष काढलें.

इकडे कालकौशिकाच्या घरीं सती तारामती आणि रोहिताश्व होतीं. पलंगावर बसलें असतांनाच पंचपक्वान्नांचें ताट जिच्या पुढ्यांत यावयाचें, ती अयोध्येची महाराणी आतां स्वयंपाकीण-बाईचें काम करूं लागली. भांडीं घासणें, धुणीं धुणें, केरपोतेरें करणें वगैरे गोष्टीहि तिला कराव्या लागत. ती पहांटे लवकर उठे आणि आपल्या कामाला लागे. दिवसभर ती कामांत चूर असे. रात्रीं सर्वांचीं जेवणें झाल्यावर उरलेलें अन्न ती जेवी आणि सर्व काम आटोपल्यावर ती झोंपायला जाई. परंतु अंथरुणावर पडल्यावर आपल्या परिस्थितीसंबंधींचे विचार तिच्या मनांत येत. विशेषतः हरिश्चंद्राविषयींच्या काळजीमुळें ती बेचैन

होई. केव्हां केव्हां तिला वाटे कीं, ईश्वर सर्व पहाणारा, सर्वांचा प्रतिपालक, अत्यंत न्यायी आणि दयाळू आहे, असें म्हणतात, हें खोटें तर नाहीं ना? 'धर्माप्रमाणें जो चालतो, त्याचें रक्षण धर्म करतो,' वचन असत्यच का? पण लगेच ती या विचाराबद्दल स्वतःलाच दोष देई व अत्यंत भक्तिपूर्वक परमेश्वराला हात जोडी.

सर्व बाजूंनीं आकाश कोसळून पडावें, तशी सती तारामतीची अवस्था झाली होती. नाहीं म्हणायला तिचा लाडका रोहित तिजपाशीं होता. परंतु त्याच्याकडे कधीं डोळे भरून पहायलाहि तिला सवड होत नसे. रात्रीं दोघें एकत्र येत. तिचा कामधंदा आटोपण्यापूर्वींच तो बालक झोंपीं जात असे.

❀

## ८ : अंतिम कसोटी

एके दिवशीं संध्याकाळच्या सुमारास रोहिताश्व इतर मुलांबरोबर बाहेर गेला होता. थोडेसें खेळून झालें. नंतर त्यांनीं दर्भ खुडले, समिधा काढल्या आणि संध्याकाळीं फुलणारीं कांहीं फुलें घेण्यासाठीं ते एका झुडपाकडे वळले. रोहिताश्व सर्वांत पुढें होता. फुलें काढण्यासाठी त्यानें झुडुपाजवळ पाऊल टाकिलें मात्र, तोंच एक भयंकर विषारी नाग फुसफुसत अंगावर आला.

"अग आईऽऽग," अशी किंकाळी मारून रोहिताश्वानें पाठीं उडी घेतली. परंतु तेवढ्यांत त्या काळसर्पानें त्याच्या पायाला कडकडून दंश केला. तेव्हां केवळ भीतीनेंच तो खालीं पडला.

बरोबरचीं सर्व मुलें फार घाबरलीं. त्यांची बोबडी वळली. काय करावें तें त्यांना कांहींच समजेना. कांहीं वेळानें धीर धरून त्यांनीं रोहिताश्वाला उठविलें. परंतु विष फार जहरी असल्यामुळें तो अगदीं निस्त्राण झाला होता. त्याच्यामध्यें बसण्याचीहि शक्ति

नव्हती. त्याचें मनहि फार खचलें होतें. कांहीं वेळ तो तसाच निपचित पडून राहिला. नंतर त्यानें आपल्या मित्रांना जवळ बोलावलें. परंतु त्याजमध्यें बोलण्याची शक्ति नव्हती. तरीहि जोर करून तो सांगूं लागला,

"मी आतां वाचणें शक्य नाहीं. तुम्हीं सर्वांनीं मजवर फार प्रेम केलें. माझ्याकडून कांहीं चूक झाली असल्यास क्षमा करा. माझ्या दुःखी आईला सांगा, तुझा लाडका रोहित तुला सोडून निघून गेला. तो म्हणत होता कीं, तुला मी सुख दिलें नाहीं, तुझी सेवा करणें माझ्या नाशिबीं नव्हतें. माझें मागील पुण्य थोर म्हणून मला तुमच्यासारखे आईबाप लाभले. मीं आतां देवाघरीं जाईन, तुमची पुण्य कहाणी त्या दयाघनाला सांगेन, त्याची प्रार्थना करीन आणि फिरून पुढच्या जन्मीं तुझ्याच उदरीं येईन. आई, तूं आणि बाबा खरे वीर आहांत, संत-महात्मे आहांत. तुमची ही कष्टमय दशासुद्धां मंगलमय आहे. बाबा भेटतील तेव्हां त्यांच्या चरणीं माझा प्रणाम सांगा, मी आतां जातों."

मित्रांनीं त्याला धीर देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. ते म्हणाले, "आम्ही गांवांत जातों आणि एकादा चांगला वैद्य घेऊन येतों. तुला अद्यापि गुण पडेल."

"नको, ही तसदी तुम्ही घेऊं नका! त्याचा कांहीं उपयोग नाहीं. माझ्यासारख्या गरीबाकरतां या अवेळीं येथें रानांत कोण येणार? विषहि माझ्या सर्व अंगांत अगदीं भिनलें आहे. माझ्या अंगाची तलखली होत आहे. आतां औषधाचा काय उपयोग? मी आतां फक्त कांहीं क्षण या जगाचा रहिवासी आहे. तेवढ्या वेळांत मी प्रभुपदाचें ध्यान करीन. तेवढीच मनाला शांति मिळेल. मी त्या कृपानिधानाला आळवीन. सांगेन, माझ्या थोर माता-पित्यांना सुख दे. त्यांना एकत्र येऊं दे." कसेबसे त्यानें हें शब्द पुरे केले. त्याचा अधिकाधिक भडका होऊं लागला. त्याचें शरीर काळें पडलें. त्याला वाटे कीं, जमिनीवर गडबडां लोळावें. परंतु धन्य त्या बालवीराची! डोळे मिटून तो निश्चल पडून राहिला.

त्याचें बोलणें बंद झालें. दृष्टि फिरली. हातपाय हळुहळू थंड पडूं लागले.

त्याचे संवगडी अतित्वरेनें गांवांत परत आले. सती तारामतीपाशीं ते आले तेव्हां ती कामांत गुंतलेली होती. त्यांनीं तिला ती सर्व हकीकत सांगितली.

जणूं कोणी लोखंडाचा गरम रस आपल्या कानांत ओतीत आहे असें तिला भासलें. क्षणभर ती डोळे भकास करून त्यांजकडे पहात राहिली. नंतर, 'अरे देवा, कसा रे माझा घात केलास ? आतां कोणाच्या तोंडाकडे पाहून दिवस काढूं ?" असें म्हणून तिनें आपल्या कपाळावर हात मारून घेतला. दुःखाच्या अतिरेकानें ती बेशुद्ध झाली.

जिचें जरासें कपाळ दुखलें तरी राजवैद्यांची तारांबळ उडे तीच अयोध्येची राणी तारामती आज पुत्रशोकानें बेशुद्ध झाली; पण तिची विचारपूस करावयास कोणीच आलें नाहीं. कांहीं वेळानें ती शुद्धीवर आली. तिला एकदम निस्त्राण झाल्यासारखें वाटलें. सर्व अवयव क्षीण झाल्यासारखे भासले. शोकाचे कढ तिला आवरतना. परंतु मोठ्यानें हुंदके देण्याची सोय नव्हती. ती तेथें गुलाम होती ना ? गुलामांना जणूं सुखदुःख नसतें !

इतक्यांत कालकौशिकाची पत्नी तेथें आली. "अग अवदसे, तेथें लोळत राहिली आहेस का ? काम कोण तुझी आई येऊन करील ?" जणूं तिनें तोफखाना सुरू केला.

दुःखी तारामती उठून कामास लागली. पेटत्या आगीसारखें तें दुःख तिनें गिळलें. काम आटोपल्यावर ती तडक घराबाहेर पडली. मुलांनीं सांगितल्याप्रमाणें अंदाजानें ती आपल्या लाडक्याच्या शोधास निघाली. रस्त्यांतील दगडधोंड्यांकडे तिचें लक्ष नव्हतें. खांचखळग्यांकडे तिचें ध्यान नव्हतें. कांट्याकुट्यांकडे ती पहात नव्हती. ठेंचाळत, पडत, ती रोहिताश्व पडला होता तेथें आली.

तिच्या हृदयाचा तुकडा राजस रोहिताश्व सर्पदंशामुळें काळा ठिक्कर होऊन तेथें पडला होता. त्याजकडे पहातांच त्या दीन मातेनें हंबरडा फोडला. वाघानें वांसरूं पकडावें म्हणजे गाय हंबरडा फोडते, अगदीं तसाच तिनें हंबरडा फोडला. तिला घेरी आली. सावध झाल्यावर तिनें आपल्या लाडक्याचें प्रेत मांडीवर घेतलें. त्याचें मुख कुरवाळून ती शोक करूं लागली.

" अरे माझ्या बाळा, कसा रे मला सोडून गेलास ? आतां मी कोणाच्या तोंडाकडे पाहूं? आमच्यावर रागावलास का ? आमच्या-मुळें तुला किती कष्ट पडले ? गाद्यांगिरद्यांवर लोळणारा माझा बाळ, आज मातींत पडला आहे. देवा, किती रे तूं निष्ठुर आहेस !"

तो शोक ऐकून दगडालाहि पाझर फुटला असता. परंतु ममताशून्य विश्वामित्रांची परीक्षा अद्यापि संपली नव्हती. वेष बदलून ते तेथें हजर झाले आणि म्हणाले,

" बाई, आतां शोक आवरा. तुम्हीं शोक केला म्हणून का तो परत येणार आहे ? गुपचुप त्याला स्मशानांत न्या आणि अग्नि द्या. येथें रानटी श्वापदें आहेत, भुतेंखेतें आहेत. तुम्हांला भीति वाटेल. प्रेताचीहि तीं विटंबना करतील."

त्याच्याच मदतीनें तिनें तें प्रेत स्मशानांत नेलें. त्याला आतां अग्नि देणार तोंच,

" कोण आहे तें ? कर दिल्याखेरीज कोण प्रेत जाळीत आहे ?', असें ओरडत स्मशानरक्षक हरिश्चंद्र धांवत आला.

तें राजपुत्राचें प्रेत, पण त्यावर धड कपडाहि नव्हता. तारा-मतीनें आपला पदर फाडून त्यावर कफन घातलें होतें. इतर प्रेतें तेथें जळत होतीं. त्यांच्या प्रकाशांत तें प्रेत हरिश्चंद्राच्या नजरेस पडलें. त्याचें स्वरूप राजबिंडें होतें. तोंड चंद्रालाहि लाजविणारें. हातांपायांवर चक्रवर्तिपणाच्या खुणा. तें पाहून हरिश्चंद्र चपापला. त्याला आपल्या सुकुमार रोहिताश्वाची आठवण झाली. त्याचा धीर खचला.

" बाळा रोहिता, तूं आतां कोठें असशील? तूं आणि तुझी आई साध्वी तारामती आतां कोणत्या स्थितींत असाल? मी तुम्हांला सोडवीन या आशेवर तुम्ही दिवस कंठीत असाल. माझी वाट पाहून तुमची अगदीं निराशा झाली असेल. बाळा, तुझा हा दुर्दैवी पिता आज हें डोंबाचें काम करीत आहे, याची तुम्हांला कल्पना तरी असेल का? माझ्यावर तुम्ही रागावलां तर नाहीं? "

त्याच्या स्वरूपामध्यें फारच फरक पडला होता. तारामती प्रथम त्याला ओळखूंहि शकली नव्हती. परंतु हरिश्चंद्राच्या शोकामुळें तिला ओळख पटली.

" हाय, प्राणनाथ अयोध्यापति, आपला प्रिय रोहित आपणांस सोडून गेला. " असा विलाप करीत ती त्याच्या अंगावर पडली. त्या वेळीं त्या दोन शुद्धहृदयी महात्म्यांनीं अपार शोक केला. त्यामुळें सारें वातावरणच शोकानें भरून गेलें. तेथील प्रत्येक वस्तु रडत आहे, असें भासूं लागलें. तेथील दगड, भिंती, झाडें इतकेंच काय, पण धगधगणाऱ्या चिताहि रडत आहेत असें वाटूं लागलें.

पुष्कळ वेळानें त्यांनीं आपला शोक आवरला. तारामतीनें स्फुंदत स्फुंदत आपली दुर्दैवी कथा त्याला सांगितली. तेव्हां हरिश्चंद्र आपली कर्मगति सांगून म्हणाला,

" प्रिये, आपण दुर्दैवी आहोंत. कोठें अयोध्येचा राजप्रासाद आणि कोठें हें काशींतील स्मशान! तो दयाघन प्रभु आपला किती अंत पहाणार कोणास माहीत! मर्जी त्याची! आपण आपला धर्म पाळूं. लोक वृद्धपणीं मुलांकडून सेवा इच्छितात. मुलें वडिलांना तिलांजलि देतात. पण आपला काळ फिरला आहे, म्हणून आपणांला आपल्या बाळाचा हा विधि उरकावा लागत आहे. "

त्यावर तारामती हुंदके देत म्हणाली, " जीवनधन, आपण पुरुष आहांत, परंतु मी एक दुबळी माता. पुत्रावर आईचा जीव

किती असतो याची प्रसंगीं पित्यालाहि कल्पना येणार नाहीं. माझा बाळ तर एकुलता एक होता. आमच्या जीवनांत त्यानें नंदनवन फुलविलें होतें. आतां आमचा आधार तुटून पडला. या दीन हरिणीच्या पाडसाची क्रूर दुर्भाग्यानें शिकार केली. नाथ, माझ्या मातृहृदयावर हा आघात झाला आहे. हें जखमी झालेलें हृदय पुन्हां सांधणार नाहीं. आतां कायमचें जखमी झालेलें हें वेदनापूर्ण जीवन जगून काय उपयोग? प्राणेशा, ही पीडा मला असह्य आहे. बाळाची चिता आपण पेटवूं. त्या धगधगत्या चितारूपी विमानांत बसून मीहि बाळाजवळ स्वर्गांत जातें. माझा बाळ माझी वाट पहात असेल. होय बाळ, या जन्मीं नाहीं रे तुला सुख दिलें! आमचें दुःख पाहून तूं आपले कष्ट झेलीत होतास. कधीं नाहीं हो केली तक्रार माझ्या बाळानें! सर्पदंश होऊन बाळ पडला, तेव्हां आई, बाबा, म्हणून टाहो फोडिला असेल. बाळ, आम्ही तुझे आईबाप कमनशिबी; शेवटच्या क्षणाला तुझ्याजवळ राहूं शकलों नाहीं. ती पहा, अजूनहि तुझी हांक माझ्या कानीं येत आहे. थांब, थोडा वेळ थांब. ही मी आलेंच."

तिला मूर्च्छा आली. हरिश्चंद्रानें आपल्या फटकुरानें वारा घालून तिला सावध केलें. तेव्हां ती म्हणाली,

"नाथ, मला क्षमा करा. आपल्या सेवेला मी कायमची अंतरणार. बाळाला सोडून मी जगूं शकत नाहीं. मला निरोप द्या."

हरिश्चंद्रानें तिला हृदयाशीं धरलें आणि सांगितलें, "हृदयेश्वरी, बाळाच्या मृत्यूची जखम माझ्याहि हृदयांत खोल गेली आहे. माझेंहि हृदय तडफड करीत आहे. पण तूं असें बोलूं लागलीस कीं, मी जास्तच कासावीस होतों. तूंसुद्धां मला सोडून गेलीस, तर मी कोणत्या आधारावर जगायचें?

तारामती, प्रिये, जरा शांत हो, तूं सूर्यवंशाची वीरवधू आहेस. चंद्रवंशाची वीरकन्या आहेस. हृदयाची दुर्बलता टाकून दे. सत्याच्या उपासनेचें असिधाराव्रत आपण घेतलें आहे. यांत आतां माघार घ्यावयाची नाहीं.

आत्मघाताचे हे विचार सोडून दे. मनुष्याला भोगावीं लागणारीं सुखदुःखें त्याच्याच कर्मांचीं फळें असतात. त्यांपासून आत्महत्या करूनहि मनुष्य पळून जाऊं शकत नाहीं. तीं धैर्यानें भोगणें आणि नेहमीं सत्कार्य आचरीत असणें एवढेंच आपणाला करतां येईल."

तारामती : नाथ, माझ्या निःसत्त्व हृदयाला हें तत्त्वज्ञान पेलणार नाहीं. अंतरंगांत पेटलेला दुःखाचा डोंब यानें कसा शांत होणार ?

हरिश्चंद्र : तारामती, तूं जाणती आहेस, विचारी आहेस. आपण महर्षि विश्वामित्रांची दक्षिणा देण्यासाठीं स्वतःस विकून घेतलें आहे. आमच्या धन्यांनीं आमच्यासाठीं कोट्यवधि धन खर्च केलें आहे. आत्महत्या केल्यानें त्यांचा विश्वासघात होणार नाहीं का ?

तारामती : महाराज, मी मनाला समजावण्याचा प्रयत्न करतें; पण तें ऐकतच नाहीं. तरीहि आपण माझे स्वामी आहांत. आपली इच्छा पुरी करणें हा माझा धर्म आहे. त्यांतच मला समाधान आहे. आपल्या शब्दाबाहेर मी जाणार नाहीं.

हरिश्चंद्र : प्रिये, हृदयावर दगड ठेवून बाळाला अग्नि देणें आतां भाग आहे. पण येथें कर द्यावा लागतो. त्याशिवाय अग्नि देतां येत नाहीं.

तारामती : नाथ, सध्यां तर आपण अनाथ आहोंत. आपण कर कोठून देणार ? गोरगरीबांना कर माफ नाहींत का ? त्यांनीं पैसे कोठून आणायचे ?

हरिश्चंद्र : नाहीं. लाडके, यांना गोरगरीब माहीत नाहींत. हे लोक पैशाखेरीज कांहीं जाणत नाहींत. धन्याची मला सक्त ताकीद आहे, कर घेतल्याखेरीज कोणतेंहि प्रेत जाळूं द्यावयाचें नाहीं. आणखी पहा, उभ्या आयुष्यांत कधीं आपण धर्मादाय वस्तूचा स्वीकार केला नाहीं. मग या आतां [illegible] करतां का आपला धर्म बुडवायचा ? तारा [illegible] आहे.

BVBK-0400386

तें ऐकून तारामती तर अगदीं दिङ्मूढ झाली. तिच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नींहि हा प्रसंग नव्हता. ती आपल्याच दुःखानें होरपळत होती. आपला नाश करण्याची दैवाचीच इच्छा दिसते, असें वाटून ती आल्या प्रसंगापुढें मान वांकविण्यास तयार झाली; नाहीं तरी आतां मृत्यूच तिचा सखा बनला होता. परंतु इतक्यांत तिच्या ध्यानांत आलें कीं, हा आपल्या चारित्र्यावर डाग आहे. ज्या शीलाकरतां रावाचे आपण रंक झालों, तें शील गमावल्याचें दूषण घेऊन आपणांस मरावें लागणार. म्हणून धैर्य धरून तिनें बोलण्याचा प्रयत्न केला.

परंतु जळजळीत निखाऱ्यासारखे लाल डोळे करून नगराध्यक्ष उसळून म्हणाला,

"चोरी आणि खून करून तूं हजारों वर्षांच्या रौरव नरकाचें पुरेसें साधन आधींच करून ठेवलें आहेस, त्यांत या खोटेपणाची कशाला भर घालतेस? न्या रे या चांडाळणीला आणि सूर्योदयापूर्वीं हिचा वध करा!"

वध करण्याची जबाबदारी डोंबाकडे असे. त्याला घेऊन नगररक्षक तारामतीसह स्मशानांत आले. तेथें सती तारामतीच्या वाटेकडे डोळे लावून हरिश्चंद्र बसला होता. ही मंडळी पाहून त्याला फारच आश्चर्य वाटलें, "हें काय? ही तर तारामती! या निष्पाप साध्वीच्या मुसक्या काय म्हणून बांधल्या? हिच्या हातांपायांत बेड्या घालण्यासारखें हिनें काय केलें? क्रूर दैवाचा हा निष्ठुर कुठाराघात दिसतो." तो असा विचार करीत आहे, तोंच डोंब पुढें आला. "हरिश्चंद्रा, ती कुऱ्हाड घे व या खुनी स्त्रीचा वध कर." त्यानें आज्ञा केली.

हरिश्चंद्रानें तारामतीकडे पाहिलें. तिची दृष्टि जमिनीवर खिळली होती. आपल्यासभोंवतीं कांहीं चाललें आहे, याचें तिला भानच नव्हतें. जणूं तिची समाधि लागली होती.

"महाराज; ही स्त्री आहे. स्त्रीचा वध करणें निषिद्ध आहे. माझ्याकडून हें काम होणार नाहीं, तुम्हांला पाहिजे तर माझ्या

तें ऐकून तारामती तर अगदीं दिङ्मूढ झाली. तिच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नींहि हा प्रसंग नव्हता. ती आपल्याच दुःखानें होरपळत होती. आपला नाश करण्याची दैवाचीच इच्छा दिसते, असें वाटून ती आल्या प्रसंगापुढें मान वांकविण्यास तयार झाली. नाहीं तरी आतां मृत्यूच तिचा सखा बनला होता. परंतु इतक्यांत तिच्या ध्यानांत आलें कीं, हा आपल्या चारित्र्यावर डाग आहे. ज्या शीलाकरतां रावाचे आपण रंक झालों, तें शील गमावल्याचें दूषण घेऊन आपणांस मरावें लागणार. म्हणून धैर्य धरून तिनें बोलण्याचा प्रयत्न केला.

परंतु जळजळीत निखाऱ्यासारखे लाल डोळे करून नगराध्यक्ष उसळून म्हणाला,

"चोरी आणि खून करून तूं हजारों वर्षांच्या रौरव नरकाचें पुरेसें साधन आधींच करून ठेवलें आहेस, त्यांत या खोटेपणाची कशाला भर घालतेस? न्या रे या चांडाळणीला आणि सूर्योदयापूर्वीं हिचा वध करा!"

वध करण्याची जबाबदारी डोंबाकडे असे. त्याला घेऊन नगररक्षक तारामतीसह स्मशानांत आले. तेथें सती तारामतीच्या वाटेकडे डोळे लावून हरिश्चंद्र बसला होता. ही मंडळी पाहून त्याला फारच आश्चर्य वाटलें, "हें काय? ही तर तारामती! या निष्पाप साध्वीच्या मुसक्या काय म्हणून बांधल्या? हिच्या हातांपायांत बेड्या घालण्यासारखें हिनें काय केलें? क्रूर दैवाचा हा निष्ठुर कुठाराघात दिसतो." तो असा विचार करीत आहे, तोंच डोंब पुढें आला. "हरिश्चंद्रा, ती कुऱ्हाड घे व या खुनी स्त्रीचा वध कर." त्यानें आज्ञा केली.

हरिश्चंद्रानें तारामतीकडे पाहिलें. तिची दृष्टि जमिनीवर खिळली होती. आपल्यासभोंवतीं कांहीं चाललें आहे, याचें तिला भानच नव्हतें. जणूं तिची समाधि लागली होती.

"महाराज; ही स्त्री आहे. स्त्रीचा वध करणें निषिद्ध आहे. माझ्याकडून हें काम होणार नाहीं, तुम्हांला पाहिजे तर माझ्या

हातीं शस्त्र द्या, हजारों शत्रूंवर मी एकटाच तुटून पडतों. तुमच्या आज्ञेनें इंद्राच्या मुसक्या बांधून आणीन, किंवा शस्त्र नसेल तर मुष्टियुद्धांत तुमचे शत्रु धुळींत लोळवीन, पण कृपा करून स्त्री-वधाचें काम मला सांगूं नका." हरिश्चंद्रानें डोंबाला विनंती केली.

"मला तुझी जास्त बडबड नको आहे, सांगितलेलें काम निमूटपणें कर. तूं गुलाम आहेस आणि धन्याची आज्ञा पाळणें गुलामांचा धर्म आहे." डोंब गरजला.

"तूं गुलाम आहेस, आणि धन्याची आज्ञा पाळणें हा गुलामांचा धर्म आहे." हरिश्चंद्र स्वतःशींच पुटपुटला, आणि त्यानें कुऱ्हाड हातीं घेतली.

तो भांबावून गेला होता. प्रकरण काय आहे, हें त्याला कळेना. हातांत कुऱ्हाड घेऊन तो वधस्तंभाजवळ आला. आपल्या सभोंवतींचें सारें जग फिरत आहे, त्यांत अरण्यांत वणवा लागावा त्याप्रमाणें सर्वत्र ज्वाला पसरल्या आहेत, असें त्याला भासूं लागलें. त्याला दरदरून घाम सुटला, त्याचा घसा सुकला, जीभ कोरडी पडली, हातपाय लटलट कांपूं लागले.

सती तारामतीनें वर मान करून हरिश्चंद्राकडे पाहिलें. तिच्या डोळ्यांत अश्रु नव्हते. तिच्या निश्चल दृष्टींत आत्मयज्ञ साकार झाला होता. त्या डोळ्यांनीं ती जणूं हरिश्चंद्राला सांगत होती,

"नाथ, धीर सोडूं नका. आपण ज्ञाते आहांत. सत्त्वशीलतेपुढें त्रिभुवनाचीहि किंमत नाहीं, हें आपण जाणतां. त्यासाठींच आपण आप्त, मित्र, वैभव, राज्य, देश या सर्वांचा त्याग केला. इतकेंच काय, पण सूर्यवंशाचें भूषण, क्षत्रियवीर आपण चांडाळाचे दास झाला. आतां थोड्यासाठीं धीर खचूं देऊं नका. माझ्यापाठीं लाडक्या रोहिताश्वाला एकट्यानेंच अग्नि द्या. आपल्या हातून मला मरण येत आहे, हें माझें परमभाग्य आहे. हे जगदंबे, जर मी खरी पतिव्रता असेन, जर धर्म आणि नीति सोडून मीं आचरण केलें नसेल, जर अतिथी आणि याचक यांना मीं विन्मुख पाठविलें नसेल आणि तुझी श्रद्धेनें पूजा केली असेल,

तर जन्मोजन्मीं मला हरिश्चंद्रच पति मिळो, आणि रोहिताश्वच माझ्या उदरीं येवो. नाथ, मी तयार आहे. आपला हात चालवा."

तिच्या तेजस्वी दृष्टीनें हरिश्चंद्राला धैर्य चढलें. त्यानें एक क्षण तारामतीकडे प्रेमभरानें पाहिलें, आणि कुऱ्हाडीचा हात वर केला. आतां तो घाव घालणार इतक्यांत,

इतक्यांत अकालीं भयंकर मेघगर्जना सुरू झाली. कडाडून विजा चमकून डोळे दिपूं लागले. सोसाट्याच्या वाऱ्यानें मोठे मोठे वृक्ष धडाधड पडूं लागले. जोराचा धरणीकंप होऊन इमारती कोसळूं लागल्या आणि जिकडेतिकडे आगी लागून त्यांचे डोंब उसळले. जगाचा प्रलयकाल आला असें वाटून सर्व घाबरले व सैरावैरां पळूं लागले. नगररक्षक, डोंब, हरिश्चंद्र आणि तारामती सभोंवतीं पाहूं लागलीं.

थोड्याच वेळांत हें सर्व थांबलें. हरिश्चंद्रानें फिरून कुऱ्हाड उचलली आणि तो घाव घालणार, तोंच कोटी सूर्य एकदम उगवावे त्याप्रमाणें प्रखर प्रकाश पडला आणि हरिश्चंद्राचा हात वरच्यावर धरला गेला.

क्षणभरांत प्रकाश मंद झाला. सुगंधित असा थंड वारा वाहूं लागला. हरिश्चंद्राच्या हातांतील कुऱ्हाड गळून पडली. संती तारामतीच्या हातांपायांतील बेड्या तूटून पडल्या. त्यांनीं डोळे उघडले. तो परम कल्याणमय सदाशिव भगवान काशीविश्वेश्वर आदिमाता पार्वतीसह वरदहस्त आपल्या मस्तकीं ठेवीत आहेत, धर्म, वरुण, यम, सोम, बृहस्पतीसह इंद्र कृपादृष्टीनें आपणांकडे पहात आहेत, कुलगुरु वसिष्ठासह देवर्षि नारद आशीर्वाद देत आहेत, आणि लाडक्या रोहिताचा हात धरून महर्षि विश्वामित्र प्रेमळ, अमृतमय दृष्टीचा जणूं वर्षाव करीत आहेत, असें त्यांस दिसलें.

आकाशांत देवांच्या विमानांची दाटी झाली होती. त्यांनीं हरिश्चंद्रावर पुष्पवृष्टि केली. दुंदुभि वाजूं लागल्या. अप्सरा नाचूं लागल्या. गंधर्वकिन्नर गाऊं लागले.